MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.
# दिशा

वर्ष अठरावे/अंक ५/मे २०१७

## संपादकीय

### महती संस्कृतची

संस्कृत ही एक प्राचीन भाषा आहे. जेव्हा भारतात सुवर्णयुग होते तेव्हा याच भाषेतून ज्ञानसाधना केली जात असे. आर्यभट्ट, ब्रह्मगुप्त, वराहमिहीर, भास्कराचार्य इत्यादी विद्वानांनी निर्माण केलेली ग्रंथसम्पदा याच भाषेत आहे. यातील बऱ्याच ग्रंथांची इतर भाषांमध्ये रुपांतरे करण्यात आली आहेत. एकंदरीत पाहता भारताच्या सुवर्णयुगात संस्कृत ही ज्ञानभाषा म्हणून प्रचलित होती. असे जरी असले तरी संस्कृत भाषेचे महत्त्व भारतीय उपखंडात कमी कमी होत गेले. जेव्हा इंग्रजानी भारतावर आपले राज्य स्थापन केले तेव्हा संस्कृत ही फक्त पंडितांची भाषा होती. दैनंदिन व्यवहारात तिचा फारसा वापर होत नसे. असे जरी असले तरी भारतावर राज्य करण्यासाठी संस्कृत भाषेचा अभ्यास करणे गरजेचे आहे असे आंग्ल विद्वानांचे मत होते. अशा आशयाचा एक लेख एस. एस. मॅक्डोनेल (S. S. MadDonell) या संस्कृतच्या अभ्यासकाने १९०६ साली प्रसिद्ध केला. दि जर्नल ऑफ दि एसियाटिक सोसायटी ऑफ ग्रेट ब्रिटन ॲण्ड आयर्लंड (The Journal of the Asiatic Society of Great Briton and Ireland) या नियतकालिकेच्या जुलै १९०६ च्या अंकात हा लेख प्रसिद्ध झाला. त्या लेखाचा मथळा होता The Study of Sanskrit as an Imperial Question. या लेखात लेखकानी संस्कृत भाषेचे भारतीय लोकांच्या जडणघडणीत असलेले महत्त्व विशद केले होते. इंग्रजांची भारतातील राजवट मजबूत करण्यासाठी काय करण्याची गरज आहे हे समजून घेण्याचा मॅक्डोनेल यांचा प्रयत्न होता. त्यांच्या मते संस्कृत भाषेचे ज्ञान असलेला अधिकारीच भारतीय लोकाना चांगले ओळखून त्यांच्यावर प्रभावीपणे राज्य करू शकेल यासाठी इंलंडमधून भारतात येणाऱ्या प्रत्येक अधिकाऱ्याला संस्कृत भाषेचे ज्ञान असलेच पाहिजे असे आग्रही प्रतिपादन मॅक्डोनल्ड यानी या लेखात केले आहे. या लेखाला शंभर वर्षांहून जास्त काळ लोटला आहे. तरीही त्यातील विचार आजही महनीय आहेत. स्वातंत्र्यानंतर संस्कृत भाषेची झालेली परवड, या भाषेला शिक्षणात दिलेले दुय्यम स्थान हे किती चुकीचे होते याची जाणीव मॅक्डोनल्ड यांच्या लेखावरून येते. त्यानी मांडलेले काही मुद्दे स्थूलरूपाने पाहू या.

हिंदू ही एक प्राचीन संस्कृती आहे आणि या संस्कृतीच्या जडणघडणीत संस्कृतचे स्थान अनन्यसाधारण आहे.

(पृष्ठ क्र २ वर)


(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

बौद्ध धर्माची शिकवण भारतातून शेजारच्या देशामध्ये पसरली आणि रुजली यात संस्कृत आणि तिची जुळी बहीण पाली या भाषांचे मोठे योगदान आहे. युरोपमध्ये लॅटिन भाषेने जी कामगिरी बजावली तेवढीच मोलाची कामगिरी संस्कृतने जगाच्या पूर्व भागात बजावली आहे. एव्हढेच नव्हे तर या भागात बोलल्या आणि लिहिल्या जाणाऱ्या अनेक भाषांची ती जननी आहे. भारतीय भाषांबरोबरच मलय, थाय, सिंहली, जपानी अशा अनेक भाषांवर संस्कृतचा प्रभाव स्पष्टपणे दिसतो. संकृत भाषेचा प्रभाव केवळ पूर्वेकडच्या देशापुरता मर्यादित न राहता पश्चिमेकडील भाषांवर देखील पडलेला आपल्याला दिसतो. इंडो युरोपिअन भाषेचे अभ्यासक याची साक्ष देतील. संस्कृत भाषेत उपलब्ध असलेले साहित्य अरबी, फारशी, लॅटीन, ग्रीक या भाषांमध्ये रूपांतरित केल्यावर या साहित्याच्या समृद्धीची कल्पना पाश्चिमात्य विद्वानांना आली. दशमान पद्धतीवर आधारलेली अंकपद्धती ही भारताची जगाला देण आहे. तिचा प्रसार या भाषेतूनच जगभर झाला. असे ठामपणे म्हणता येते की संस्कृतने जगावर अधिराज्य गाजवले. मॅक्डोनेल हे ठासून सांगतात की या भाषेच्या प्रसारात कुठेही तलवारीचा वापर केला गेला नाही. या भाषेच्या आंतरिक वैशिष्ट्यामुळेच तिची पाळेमुळे सर्वदूर पसरली.

मॅक्डोनेल्ड हे एक भाषातज्ज्ञ होते. असे जरी असले तरी भाषेच्या विकासावर लेख लिहिणे हा त्यांचा उद्‌देश नव्हता. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत इस्ट इंडिया कंपनीने भारताचा बराच मोठा भूभाग आपल्या आधिपत्याखाली आणला होता. या भागांवर नियंत्रण ठेवण्यासाठी इंग्रज अधिकारी इंग्लंडमधून भारतात पाठवले जात असत. त्यापूर्वी त्यांना योग्य ते प्रशिक्षण दिले जात असे. या प्रशिक्षणात संस्कृत भाषेचा अभ्यास अनिवार्य असला पाहिजे असे आग्रही प्रतिपादन मॅक्डोनेल यानी या लेखातून केले आहे. त्यांच्या मते संस्कृत ही भारतीय भाषांची जननी असून भारतीय उपखंडातील बहुतेक भाषांचा उगम संस्कृतमधूनच झालेला आहे. आज जरी ती भाषा बोलली जात नसली तरी त्या भाषेचा आणि त्या भाषेतील साहित्याचा भारतीय समाजाच्या जडणघडणीवर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष प्रभाव पडलेला आहे. त्यामुळे त्या लोकांवर राज्य करायचे असेल तर संस्कृत भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे असे ते म्हणतात. त्यांच्या मताला पुष्टी देण्यासाठी यशस्वी अधिकाऱ्यांची उदाहरणे ते देतात. संस्कृत भाषेची त्यांना असलेली जाणच त्यांना भारताला योग्य अशी विशिष्ट कार्यपद्धती स्वीकारण्याची प्रेरणा देते असे त्यांचे स्पष्ट मत होते.

संस्कृत भाषेचे महत्त्व लक्षात येताच युरोपीयन देशातील विद्यापीठांमध्ये या भाषेचा पद्धतशीर अभ्यास सुरू करण्यात आला. जर्मनी या बाबतीत अग्रक्रमावर होते. इंग्लंडमध्येदेखील काही विद्यापीठात संस्कृत विभाग स्थापन करण्यात आले. त्याचबरोबर भारतीय विद्यापीठांमध्ये संकृत भाषेतील साहित्याचा अभ्यास करण्यासाठी आंग्ल भाषिक तज्ज्ञ नेमण्यात आले होते. मॅक्डोनेल यांच्या मते ही संख्या फारच कमी होती. ब्रिटिश सरकारने संकृत भाषेच्या अभ्यासाकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे असे स्पष्ट मत त्यानी लेखात व्यक्त

(पृष्ठ क्र.३ वर)



व्ही.पी.एम्.
# दिशा

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

**वर्ष अठरावे/अंक ५/मे २०१७**

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २१ वे/अंक ११ वा

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | सिंगापूरचे राष्ट्रीय वस्तूसंग्रहालय | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | मूल्यवेध-७: विकासाभिमुखता | श्री. नरेंद्र गोळे | ६ |
| ४) | नर्मदा परिक्रमा (भाग : १) | श्री. अरविंद ओक | ९ |
| ५) | जागतिक मातृदिन | श्री. अरविन्द दोडे | १२ |
| ६) | ओळख वनस्पतींची - वाकेरी | श्री. प्रकाश दुधाळकर | १५ |
| ७) | सुभाषित - खरा मित्र | प्रा. प्रशांत धर्माधिकारी | १७ |
| ८) | धर्मवेडामुळे झालेली शोकांतिका : औरंगजेब | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | १९ |
| ९) | परिसर वार्ता | संकलित | ३१ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगीमूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# सिंगापूरचे राष्ट्रीय वस्तूसंग्रहालय

*सिंगापूर शहरात समृद्ध असे वस्तूसंग्रहालय आहे. या संग्रहालयाला प्रत्यक्ष भेट देऊन हा लेख लिहिलेला आहे*
*– संपादक*

डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन संस्थेत पी. जी. डी. एम. अभ्यासक्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल सिंगापूरला आयोजित करण्यात आली होती. या सहलीत शहरातील अनेक महत्त्वाच्या ठिकाणांना भेटी देण्यात आल्या. त्यातील एक होते राष्ट्रीय वस्तूसंग्रहालय. या भेटीवर हा लेख आधारलेला आहे...

त्या दिवशी सकाळी आमची सिंगापूर व्यवस्थापन विद्यापीठाला भेट ठरली होती. ती आटपेपर्यंत दुपार झाली. याच्या पुढचा कार्यक्रम काय आहे? अशी आमच्या विद्यापीठातील यजमानांनी पृच्छा केली तेव्हा, 'आम्ही संग्रहालय पाहायला जाणार आहोत' असे त्यांना सांगितले. ही दोन्ही ठिकाणे जवळ जवळ असून मध्ये केवळ एक रस्ता आहे. हा रस्ता ओलांडण्यासाठी एक भुयारी मार्ग आहे. याच मार्गाने आमच्या यजमानांनी आम्हाला संग्रहालयाच्या दारापाशी सोडले. व्हिक्टोरियन पद्धतीने बांधलेली संग्रहालयाची ती पांढरी शुभ्र इमारत आम्ही क्षणभर पाहातच राहिलो.



**राष्ट्रीय संग्रहालयाची सुबक इमारत**

इमारतीचे संपूर्ण बांधकाम मोठमोठ्या दगडांनी केलेले आहे. या इमारतीचे दोन भाग असून प्रत्येक भाग आयताकृती आहे. दर्शनी भागात एक मोठा घुमट आहे. तो दुरूनच आपल्या दृष्टीस पडतो. आपण जेव्हा संग्रहालयात प्रवेश करतो तेव्हा याच घुमटाखाली येतो. घुमटाखाली असलेल्या जागेचा अतिशय शिताफीने उपयोग करून घेतला आहे. स्वयंपाकघरात वापरलेली विविध आकाराची आणि विविध धातूपासून बनवलेली जुनी भांडी त्यांनी गोळा केली. ही सगळी भांडी अशा पद्धतीने लावून ठेवली आहेत की त्याच्यापासून गोल आकार तयार झाला आहे (खालील चित्र पाहा). ते दृश्य पाहायाला फारच मनोहारी असे होते.



**वापरलेल्या भांड्यांचे प्रदर्शन**

शहरात एक संग्रहालय असावे याची मूळ कल्पना सर स्टॅमफोर्ड रॅफेल ता ब्रिटिश माणसाची. भारताप्रमाणे सिंगापूरवर देखील ब्रिटिशांचे राज्य होते. या शहराचा कारभार पाहण्यासाठी इंग्लंडमधून ब्रिटिश अधिकारी पाठविले जात असत. सर रॅफेल हे त्यातलेच एक. आपल्या आयुष्याचा बराच मोठा काळ त्यांनी सिंगापूर शहरात घालविला. त्यांच्या कारकिर्दीत अनेक

विकासकामे पूर्ण करण्यात आली. संग्रहालय उभारण्यात देखील त्यांनीच पुढाकार घेतला. त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन १८४९ साली वाचनालय आणि वस्तू संग्रहालय एकत्रितपणे उभे राहिले. त्या संग्रहालयाला रॅफेल याचेच नाव देण्यात आले होते. कालांतराने वाचनालय आणि संग्रहालय वेगळी करण्यात आली. त्यात आणखी वस्तूंची भर घालून संग्रह समृद्ध करण्यात आले. त्यानंतर संग्रहालयाला शोभेल अशी इमारत बांधण्यात आली. व्हिक्टोरिया राणीच्या राज्याभिषेकाला ५० वर्षे पूर्ण झाली या बाबीचे औचित्य साधून १८८७ मध्ये संग्रहालय नवीन इमारतीत स्थलांतरित करण्यात आले. ही इमारत तर सुबक आहेच, त्याचबरोबर आतील वस्तूदेखील सुबकपणे मांडून ठेवलेल्या आहेत. त्यामुळे संग्रहालय खूपच मोहक झाले आहे.



**शोभेसाठी ठेवलेल्या वस्तू**

संग्रहालय दोन भागात विभागले आहे. त्याचा पहिला भाग कायमच्या संग्रहासाठी राखून ठेवलेला आहे. या भागात सिंगापूर आणि आजूबाजूचा परिसर येथे सापडणाऱ्या वस्तू प्रदर्शित करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये नक्षीकाम केलेल्या अनेक वस्तू आहेत. वेगवेगळ्या आकाराची आणि वेगवेगळ्या रंगाची भांडी आपल्याला तेथे पाहायला मिळतात. सिंगापूर हे मूळचे मासेमारी करणाऱ्या लोकांचे गाव होते. ते स्वरूप बदलून त्याला आता एका प्रगत शहराचे रूप प्राप्त झाले. हा बदल मागील दोन-तीनशे वर्षात क्रमाक्रमाने झाला. या प्रगतीचे टप्पे प्रदर्शनात उलगडून दाखविले आहेत. या प्रदर्शनात भारतातील अनेक वस्तू मांडून ठेवलेल्या आहेत.



**भारतीय कपड्यांचे प्रदर्शन**

संग्रहालयाचा दुसरा भाग अस्थिर अशा प्रदर्शनासाठी राखून ठेवण्यात आला आहे. प्रसंगाला अनुरूप असे प्रदर्शन या भागात भरवले जाते. आम्ही गेलो तेव्हा एका प्रसिद्ध चित्रकाराच्या चित्रांचे प्रदर्शन तेथे भरले होते. परंतु आम्हाला त्याचा आस्वाद घेता आला नाही. याचे कारण आमच्या चमूतील सभासदांना दुसऱ्या ठिकाणी जायचे होते. त्यामुळे आम्ही संग्रहालयातून काढता पाय घेतला. या भेटीत जरी मला तिकडे असलेले प्रदर्शन पाहता आले नाही तरी या आधीच्या भेटीत मला एक अतिशय महत्त्वाचे असे प्रदर्शन पाहायची संधी मिळाली होती. त्याची माहिती देणे सयुक्तिक ठरेल. ते होते ली क्युआन यू यांचा जीवनपट दाखविणारे प्रदर्शन.




**एका महान पुढाऱ्याचे मत**

सिंगापूरच्या विकासात ली क्युआन यू यांचा सिंहाचा

वाटा आहे. १९६५ मध्ये सिंगापूर आणि मलेशिया स्वतंत्र झाले. सुरुवातीची दोन वर्षे सिंगापूरचे अस्तित्व मलेशियातील एक शहर असेच होते. १९६७ मध्ये मात्र सिंगापूर हे स्वतंत्र राष्ट्र म्हणून उदयाला आले. त्यावेळेस अनेक अर्थतज्ज्ञांनी नाके मुरडली होती. त्यांच्या दृष्टीने सिंगापूर देश म्हणून टिकून राहणे अशक्य होते. त्यांचे म्हणणे अगदीच बिनबुडाचे होते असे नाही. देशाला स्थैर्य देणारी साधनसंपत्ती त्यांच्याकडे नव्हती आणि आजही नाही. या मोठ्या त्रुटीला तोंड देऊन या शहराने जो विकास साधला त्याचे श्रेय ली क्युआन यू यांच्या नेतृत्वाला जाते. मार्च २०१५ ला या दूरदर्शी नेत्याचे निधन झाले. त्यानंतर लगेचच त्यांच्या जीवनावर आधारित एक प्रदर्शन तेथे भरवले गेले. दुसऱ्या एका कामाच्या निमित्ताने मला त्या काळात सिंगापूरला जाण्याची संधी मिळाली होती. ती साधून मी ते प्रदर्शन पूर्णपणे पाहिले होते. त्यातील काही छायाचित्रे पुढे दिलेली आहेत.




**प्रदर्शनाच्या ठिकाणी आपले मत नोंदवायला मुभा होती**




**स्वातंत्र्यापूर्वीचा पंधरा वर्षांचा कालावधी**




**स्वातंत्र्यानंतरचा पंचवीस वर्षांचा कालावधी**

**- डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, विसावा, वैभवनगरी,
कल्याण-शीळ रोड,
काटई, ता. कल्याण,
जि. ठाणे - ४२१२०४

•••

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**- संपादक**

जो कीर्तीची अभिलाषा धरत नाही तोच लेखक सर्वात सुखी असतो. - डब्ल्यू. आयर्विंग

# मूल्यवेध-७: विकासाभिमुखता

*‘ठेविले अनंते तैसेची राहावे’ ह्या तुकाराम महाराजांच्या शिकवणुकीचा, ‘विकासाभिमुखता’ सोडून द्यावी असा जो अर्थ काढला गेला, तो चूकच म्हणावा लागेल. विकासाभिमुखतेचा अर्थ या लेखात विशद केला आहे.*
*– संपादक*

**ठेविले अनंते तैसेची राहावे ।**
**चित्ती असू द्यावे, समाधान ।। – संत तुकाराम**

‘न संतोषात परं सुखम्।’ ह्या उक्तीनुसार आहे त्यात समाधान मानावे हे समजता येण्यासारखे आहे. अष्टांगयोग साधनेतील; अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह हे पाच यम; तसेच शौच, संतोष, तप, स्वाध्याय आणि ईश्वरप्रणिधान हे पाच नियम; ह्यांपैकी ‘संतोष’ हा तर आपल्या जीवनशैलीचा नियमच आहे. मात्र ‘ठेविले अनंते तैसेची राहावे’ ह्या तुकाराम महाराजांच्या शिकवणुकीचा, ‘विकासाभिमुखता’ सोडून द्यावी असा जो अर्थ काढला गेला, तो चूकच म्हणावा लागेल. एरव्ही,

**असाध्य ते साध्य करिता सायास ।**
**कारण अभ्यास, तुका म्हणे ।। – संत तुकाराम**

असा उपदेश त्यांनी केला नसता. त्यामुळे,

**जरी नित्य परिवर्तनास्तव मी झटेन ।**
**तक्रार सद्यस्थितीची करणार नाही ।।**

**नि:शब्द नित्य परिश्रम मी करेन ।**
**मी वेचणार शब्दही व्यर्थ नाही ।।**

– नरेंद्र गोळे

असा संकल्प आपण सगळ्यांनीच केला पाहिजे. परिवर्तन ही जीवनाची मूलभूत रीत असते. परिवर्तनालाच आपण विकास म्हणत असतो. कारण जे परिवर्तन आपण घडवून आणत असतो त्याची दिशा, आपल्याच ईप्सितांच्या सिद्धतेची असते. एरव्ही चराचर सृष्टीत आमूलाग्र परिवर्तने सतत घडून येतच असतात. त्यांना मात्र आपल्या ईप्सितांची क्षिती नसते. पर्वा नसते. आपल्याला जे हवेसे वाटते, जे घडून यावे असे वाटते, ते घडवून आणण्यासाठी आपणच प्रयत्नशील असायला हवे. रामदास स्वामी म्हणतातः केल्याने होत आहे रे । आधी केलेची पाहिजे ।।

ह्याच अर्थाचे एक अत्यंत समर्पक संस्कृत सुभाषित आहे:

**उद्यमेन हि सिध्यन्ति कार्याणि न मनोरथैः ।**
**नहि सुप्तस्य सिंहस्य प्रविशयन्ति मुखे मृगाः ।।**

म्हणजेः

**केल्याने होत आहे रे, इच्छिल्याने न केवळ ।**
**तोंडी सुप्त सिंहाच्या, न कधी प्रवेशती पशू ।।**

– मराठी अनुवादः नरेंद्र गोळे

त्यामुळे काहीतरी केले पाहिजे हे तर खरेच, मात्र काय केले पाहिजे ह्याचा शोध आपल्याला कर्तव्याप्रत घेऊन जातो. आपल्या आकांक्षांना मूर्त स्वरूप देण्याकरता, आपली सर्व स्वप्ने साकार करण्यासाठी आणि सदासर्वकाळ आपल्याला सुखात राहता यावे म्हणून जे जे करणे आवश्यक असेल ते ते कर्तव्य ठरते. कर्तव्यांच्या पूर्ततेकरता आपण जे कष्ट करतो त्यामुळे आपण आपलाच उद्धार साधत असतो. विकास घडवत असतो. दरम्यान जे घडून येत असते, त्यालाच विकास म्हणतात.

जर आपल्याला जे जे हवे ते ते बसल्या जागी, काहीच न करता, सुखैनैव प्राप्त होत राहिले, तर तशी व्यक्ती विकासाला अभिमुख राहत नाही. तिला असे भासू लागते की, आपली सरबराई होत राहणे क्रमप्राप्तच आहे. ते इतरांचे कर्तव्यच आहे. ती आपल्या देशाची, आपल्याप्रतीची जबाबदारी आहे. आपले आई-बाप, कुटुंबीय, निकटवर्तीय अनेकदा अशा प्रकारे आपले कोड पुरवत असतात. खरे तर त्यांनी असे करू नये. कष्ट केल्याविना आपले आपण उन्नयन करू शकणार नाही, उपजीविका चालवू शकणार नाही, पोटही भरू शकणार नाही ह्याची सम्यक जाणीव त्यांनी आपल्याला करून द्यावयास हवी. वस्तुस्थिती अशी असते की, पानावर बसल्यावर आज जे जेवण आपल्या पुढ्यात येत असते, ते आपल्याच किंवा इतर कुणाच्या तरी पूर्वसुकृतांचे फळ असते. तसे ते इतरांच्या पूर्वसुकृतांचे फळ असण्याऐवजी आपल्याच कष्टांचे फळ असावे, अशी सामान्य इच्छा प्रत्येकाच्या मनात उजागर करणे, हेच विकासाभिमुखतेसाठीचे पहिले पाऊल असते.

'काहीतरी करून दाखविल्याखेरीज मी अन्नग्रहण करणार नाही. लोकोपयोगी सेवा, साधने, विचार, नियोजन इत्यादिकांची निर्मिती केल्याखेरीज मी उपभोगाची साधने वापरणार नाही. मी 'खायला काळ आणि भुईला भार' होणार नाही. मी कुठेही राहत असेन, तरी निकटवर्तीयांना मी हवाहवासा वाटेन. त्यांच्या सुखाचे साधन ठरेन.' असा संकल्प प्रत्येकाने करावा. त्यामुळे निरपवादपणे प्रत्येक व्यक्ती उत्पादक संसाधन होईल. समाजाला हव्याशा उत्तरांचा भाग होईल. समाजापुढे प्रश्नच केवळ उपस्थित करणार नाही. प्रत्येक व्यक्ती जर अशा रीतीने, परिपुष्ट राहिली नाही, स्वावलंबी झाली, इतरांच्या मदतीस सक्षम झाली; तर समाजाचा विकास नक्कीच होणार. असे होणे म्हणजेच विकासाभिमुख होणे आहे.

आपल्या स्वतःच्या गरजांपेक्षा अधिक सेवा, साधने, विचार, नियोजन इत्यादिकांची निर्मिती करणारी व्यक्ती समाजापाशी अतिरिक्त संसाधने साचवत जाते. उन्नतीस पोषक ठरत जाते. विकास घडवत जाते.

सर्वच व्यक्ती सारख्याच सामर्थ्यांनिशी जन्म घेत नाहीत. सगळ्यांच्या सर्व सामर्थ्यांचा विकासही एकसारखा होत नाही. शिवाय जीवनप्रवासाच्या ओघात काही सामर्थ्यांचा अपघाती ऱ्हासही होत जातो. तर काही सामर्थ्ये वयपरत्वे नाहीशी होत जातात. ह्याशिवाय बाल्यावस्थेतील मनुष्यजीवन उत्पादक असत नाही आणि जराप्राप्त मनुष्येही आपापली आयुष्ये स्वावलंबी राखू शकत नाहीत. त्यामुळे समाजाला अशा सर्वांच्या पालनपोषणाकरता अतिरिक्त संसाधनांची आवश्यकता असते. म्हणून आपल्या कार्यकाळात अतिरिक्त संसाधने साचवत जाणाऱ्या व्यक्तींकडे समाज कायमच अपेक्षेने पाहत असतो.

प्रत्यक्षात परावलंबी व्यक्तींनाही आपापल्या परावलंबित्वाची बोच असतेच असते. ते स्वावलंबित्वाचे मार्ग शोधतच असतात. समाजाने ते त्यांना उपलब्ध करून द्यावयास हवेत. तसे ते करून दिल्यास काय घडून येऊ शकते ह्याचे उद्बोधक उदाहरण 'आनंदवना' च्या स्वरूपात थोर समाजसेवक मुरलीधर देवीदास आमटे उपाख्य बाबा आमटे ह्यांनी उभे केलेले आहे.

कुष्ठरोग्यांच्या पुनर्वसनाकरता त्यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा तालुक्यात १९४९ साली 'महारोगी सेवा समितीच्या' माध्यमातून एक वसाहत उभी केली. रोग बरा झाल्यावरही समाज ज्या रोग्यांचा स्वीकार करत नव्हता असे लंगडे, लुळे, थोटे, आंधळे कुष्ठरोगी तेथे येऊन आसरा मिळवू लागले. अशा परावलंबितांना कायमस्वरूपी पोसणारे अनेक आश्रम इतरत्रही आहेत. मात्र 'आनंदवनात' त्यांना पोषण पुरविण्याबरोबरच,

ज्यांना जखमांची भीती वाटते त्यांनी रणांगणात कधी जाऊच नये. - जॉन क्लार्क

जगण्याचे सामर्थ्यही त्यांच्यात निर्माण करण्याचे प्रयास बाबांनी केले. अत्यंत कृश, हात-पाय गमावलेले, दृष्टी गमावलेले लोक हतबल, निराश होत असत. त्यांच्यात तेही काहीतरी काम करू शकतात, त्यांच्या कामांना खुल्या समाजात 'मागणी' प्राप्त होऊ शकते, त्यांनी निर्माण केलेली वस्त्रे, पंचे, रुमाल, आसने, बस्करे, सतरंज्या, 'सद्भावनापत्रे', कलाकुसरीच्या इतरही वस्तूंची विक्री करून त्यावर त्यांची उपजीविका चालू शकते, असा आत्मविश्वास बाबांनी निर्माण केला. आजमितीस 'आनंदवनात' तयार होणारे दूध 'निर्भेळ' विकले जाते म्हणून रांगा लावून विकत घेणारे लोक आहेत, 'आनंदवनात' तयार होणारे कपडे 'स्वस्तात मस्त' असतात म्हणून दूरवरच्या बाजारपेठांत त्यांचा खप होत आहे, खुल्या समाजात इतरत्र कुठेही न मिळणारा 'आत्मसन्मान' मिळतो म्हणून इथले रहिवासी खूश आहेत. अशा प्रकारचे खरेखुरे 'आनंदवन' बाबांनी निर्माण केले आहे. प्रत्येकातील अंगभूत 'विकासाभिमुखता' कार्यान्वित करण्याचे यापरता दुसरे उदाहरण कोणते देता येईल?

मनुष्यजीव आपल्या कोणत्याही अवस्थेत आपापली उपजीविका साधण्यास सक्षम असतो. नसेल तर तो लवकरच जीव गमावतो. सजीव राहत नाही. प्राणी वा पक्षी अखेरपर्यंत स्वतःचे पोट स्वतःच भरतात. एक गाय दुसरीला चारा आणून देते आहे असे दिसत नाही. कावळा चिमणीला चारा भरवतो आहे असेही कधी दिसून येत नाही. ते केवळ त्यांच्या पिलांना, तेही ती सक्षम होईपर्यंतच भरवण्याचे काम मात्र करत असतात. नंतर नाही. त्यामुळे प्रत्येक सजीवाने, प्राणी वा पक्षी जगतातील रहाटीनुसार आपापली उपजीविका स्वतःच चालवावी. त्यासाठी अहोरात्र झटून कष्ट उपसण्याची रीत विकसित करावी. असाध्य कलाकारी अवगत करून इतरेजनांस ती हवीशी करावी. अविरत विद्याभ्यास करून, अनेकानेक कौशल्ये विकसित करून, स्वाभिमानाने जगावे. समाजाने त्याकरता सगळ्यांना उपजीविकेची संधी उपलब्ध करून द्यावी. थेट उपजीविका मात्र देऊ नये. आळशी बनण्यास वावच देऊ नये.

संत बहिणाबाई सुगरणीच्या खोप्याचे उदाहरण देतांना म्हणतात:

**खोप्यामधी खोपा, सुगरणीचा चांगला ।**
**पाहा पिलासाठी तिनं, झोका झाडाला टांगला।।धृ।।**

**पिलं निजली खोप्यात, जसा झुलता बंगला ।**
**तिचा पिलामधी जीव, जीव झाडाला टांगला ।।१।।**

**खोपा इनला इनला, जसा गिलक्याचा कोसा ।**
**पाखरांची कारागिरी, जरा देख रे मानसा ।।२।।**

**तिची उलूशीच चोच, तेच दात, तेच ओठ ।**
**तुले देले रे देवानं, दोन हात, दहा बोटं ।।३।**

उलूशाच चोचीने गवताची पाती तोडून आणून, सुगरण पक्षी जेव्हा खोपा विणत असतो, तेव्हाचे दृश्य पाहण्यासारखे असते. एक पाते आणायचे, काटेरी फांदीच्या लांबवरच्या टोकाला उडत-उडतच ते बांधायचे; मग एकाला दुसरे, मग त्याला तिसरे, मग उभे, मग आडवे. अशी गवताची पाती विणत मग खोपा तयार होतो. त्या पक्षापासून आपण सृजनाची शिकवण घ्यावी.

दोन हात, दहा बोटे, शिवाय दोन पाय आणि त्यांनाही दहा बोटे देऊन, ज्या मनुष्यप्राण्यास ईश्वराने सन्मानित केले आहे; त्याने केवळ देदिप्यमान कामगिरी करण्याचीच उमेद बाळगावी. नव्हे तशी कामगिरी प्रत्यक्षात करून दाखवावी. ईश्वराने ज्यांना अपुरी सामर्थ्ये दिली, त्यांच्याही कर्तबांपासून सम्यक बोध घ्यावा. 'विकासाभिमुख' राहावे.

(पृष्ठ क्र. १६ वर)

---

जर गतअन्याय बिनतक्रार सहन केलेत, तर नवीन अन्यायांना तुम्ही उत्तेजन दिल्यासारखे होईल. – पी. सायरस

# नर्मदा परिक्रमा

**भाग : १**

*नर्मदा परिक्रमा लेख मालिका खंडीत झाली होती. त्या मालिकेचा हा पुढचा टप्पा. लेखकाचे चौफेर निरीक्षण, भेटलेली माणसे या नोंदी वाचण्यासारख्या आहेत - संपादक*

**शुक्रवार दि. २२/११/२०१३ दिवस १ ला :**

बसने जोगी टिकरियाला उतरलो. दुपारेच १२॥ झाले होते. उतरून सरळ घाटावर गेलो. स्नान केले. फार दिवसांनी चैतन्याचा पुनर्संचार झाला.

स्नानानंतर कपडे धुतले, घाटावरच वाळत घातले व नर्मदेची पूजा केली. दरम्यान काही मुले घाटावर स्नान करीत होती. त्यातल्या एकाने फार आपुलकीने प्रतिसाद दिला व सव्वादोनला त्याच्या घरी भोजनासाठी नेले.

गरीबरथ गाडी जबलपूरला सकाळी ५.४० म्हणजे २० मिनिटे वेळेआधी पोहोचली. स्टेशनबाहेर चहा पिऊन सरळ बस स्टॅण्ड गाठला. तुरळक माणसे होती. इलेक्शनमुळे आज बसेस नाहीत असे पेपरवाल्याकडून समजले. परंतु आगारात भरपूर बसेस दिसल्या.

निराश झालो. चुकीचा दिवस निवडला असे वाटून गेले. संपर्क नावाची आठवण झाली. परंतु फोन वगैरे केला नाही. (येताना Free Incoming साठी ७७ रुपये भरून आलो आणि आता SMS द्वारे कळले ही सवलत Vodafone व्यतिरिक्त लागू नाही आणि इथे मध्य प्रदेशात प्रामुख्याने एअरटेल आणि रिलायन्स नेटवर्क चालते.)

गाडीत रात्री बूट पॅक करून चपला घातल्या होत्या. त्या घालून बस स्टॅण्ड गाठला होता. कारण बसमध्ये चपला काढून बसता येते. आता सर्व ओझे गळ्यात वागवावे लागेल कारण बस मिळण्याची शक्यता नाही त्यामुळे वजन कमी करण्यासाठी बूट घालत असतानाच समोर खाजगी बस-अमरकंटकला जाणारी लागली.

बस स्टॅण्ड गाठण्यापूर्वी फक्त चहा घेतला होता. नंतर बस मार्गात वाटेत न्याहारी दिसली पण बस फार थांबली नाही आणि साडे अकराला १० मिनिटांसाठी थांबली तिथे जेवणाचा धाबा होता. न्याहारी नव्हती. दोन बिस्किटांचे पार्ले ग्लुको विकत घेतले पण खाल्ले मात्र नाहीत.

बसमध्ये सहप्रवासी होता तो व्होल्टासमध्ये नोकरीला होता आणि गेली तीन वर्षे कंपनीतर्फे याच भागात आहे. तो विक्रोळी भांडुपचा. नाव सडेलकर, चिंचपोकळी ऑफिस. मध्य प्रदेशात, विजेचे खांब उभारून नवनवीन गावात वीज पोहोचविण्याचे काम ELE रोहिणी नावाने स्वतः VOLTAS करीत आहे. वायर उघड्या नसून Coated वापरल्याने आकडेतंत्राने वीज चोरता येत नाही.

त्याचा मुक्काम मंडल्याला असतो. नाव, फोन नंबर घेतला आहे. दक्षिण तटावार तिथे १०/१५ दिवसात पोहोचल्यावर पाहू.

बसमध्ये भूक तर लागली होती पण बिस्किटे घेतल्यावरही खाता आली नाहीत. कारण सहप्रवासी, त्याची न्याहारी सकाळी झाल्याने, बरोबर खायला तयार नव्हता व मला एकट्याने खाणे प्रशस्त वाटत नव्हते.

जबलपूर-जोगी टिकरिया अंतर दीडशे (१५०) कि.मी. आहे. सहपुरा गावापर्यंत ही सर्व वाट मी पूर्वी पायी तुडविली आहे. नंतर लागलेली विक्रमपूर वगैरे गावे मात्र पार केलीच नव्हती. १२॥च्या सुमारास नदीशेजारी उतरलो. नदीघाटावर जाताना बाजूलाच चहाच्या टपऱ्या दिसल्या. चहाबरोबर बिस्किटे तरी

उपेक्षा होणे यासारखी भयंकर शिक्षा कुठल्याही लेखकाला नाही. - एस. जॉनसन

खावी या विचाराने क्षणभर थबकलो परंतु लगेच स्नानासाठी घाटावर निघालो.

स्नान आटपून पाहू हा विचार होता परंतु नंतर सगळेच राहून गेले. कारण स्नान, कपडे, पूजा ही साखळी!

घाटावर बरीच लहान मुले पाण्यात खेळत होती. नदीला येथे दीड दोन फुटाहून खोल पाणी नव्हते. काठावर बसून आंघोळ केली. दोन तीन मोठी मुले साबण लावून बूट, दप्तर, कपडे इत्यादी स्वच्छ करण्यात गुंतले होते.

MP चे विशेष नदीकाठचे लोक फार श्रद्धावान व मदत तत्पर आहेत असे मी म्हणताच एकाने सांगितले की, या बाबतीत आपण चिंताच करू नये. सर्व मदत आपल्याला मिळेल.

पूजा इ. आटपावी तर घाटावर सावली नव्हती. वर थोड्या सावलीत एक शिव घुमटी होती. अत्यावश्यक गोष्टी घेऊन वर गेलो पूजेसाठी! इतर सर्व वस्तू घाटावरच सोडल्या होत्या.

पूजा आटोपली सर्व वस्तू सॅकमध्ये भरल्या. पण नीरांजन अजून तेवत असल्याने थांबावे लागले. शिवम् पुढे घरी गेला, त्याच्या चुलत भावाने नंतर मला मोटर सायकल वरून शिवम्च्या घरी सोडले. घर नदी घाटापासून फार दूर नव्हते. मुख्य रस्त्यावरच आहे.

शिवम्च्या आईने स्वयंपाक असूनही पारोश्याने केला होता. म्हणून पुऱ्या, बटाट्याच्या काचऱ्या वगैरे स्वयंपाक नव्याने केला.

परिक्रमावासी पंडितजी घरी आल्याने घर पवित्र झाल्याचा आनंद त्यांनी शब्दात व्यक्त केला. खरे म्हणजे त्याहून आनंद मला झाला कारण भोजन व निवासाची व्यवस्था मैय्याने केली. माझा संभ्रम तात्काळ नष्ट केला!

इंग्लिश शिवमूला कठीण जाते म्हणून त्याला घेऊन ओट्यावर बसलो तो एकपाठोपाठ सात-आठ लहान मुले औत्स्युक्याने जमली. त्यांच्याकडून एक-दोन कविता वदवून घेतल्या नंतर ‘कराग्रे वसते लक्ष्मीः’ हा श्लोक त्यांना संथा देऊन म्हणून घेतला व अर्थही समजाविला.

शिवम् त्यांना ‘घरी जा घरी जा’ सांगत होता परंतु मीच त्याला थोपविले. इंग्लिशचा अभ्यास अर्थात् लांबणीवर!

५ नंतर त्याच वस्तीत थोडे फिरून गप्पा गोष्टी केल्या. वस्तीतली पाच-सहा घरे याच चौहान नातलगांची आहेत.

कुंपणाला लाल चटुक गणेशवेल दिसला. त्याच्या बऱ्याच बिया गोळा केल्या. बऱ्याच जणांनी यासाठी मदत केली. या गणेशवेलाचे पान, फूल, बी सारेच मोठे आहे.

घरी परतलो तोवर शिवम्चे मंडलाला गेलेले पिताजी आले होते. कुठलातरी नव्हे तर आसपास राहणारा एक अती वयस्क साधू ट्रीटमेण्टसाठी आला होता. जाण्यापूर्वी पैसे ठेवून गेला. पिताजी हे काम जाणतात.

घरातील मंडळी, काका (वयस्कर) यांच्याबरोबर अनायासे दैवीसंबंध, जीव जगदीश संबंध याची चर्चा झाली! रात्री पुन्हा पुरी, पालेभाजी, मुळा, भजी, भात-वरण असा उत्तम बेत झाला. तत्पूर्वी पूजा, रामरक्षा इत्यादी आटोपले होते. मध्ये बासरी वादन-एक गाणे झाले होते.

छोट्या रियाचे कान अजून टोचलेले नाहीत. रिया, अंकिता या दोघींना कर्णफुले दिली. त्यांचा आनंद हीच मोठी भेट मला भासली. आता रियाचे कान टोचावेच लागतील.

घर लहान. सगळे झोपू शकणार नाहीत म्हणून मला जवळच असलेल्या त्यांच्या मोठ्या घरात पाठविले आहे. तिथे बसूनच ही डायरी पुरी करीत आहे.

---

अन्यायाची निपज जेथे होते तेथेच ते विराम पावत नाहीत, तर नवनवे अन्याय त्यातून निपजत असतात. - एस. डॅनियल

**शनिवार दि.२३/११/२०१३ दिवस २ रा :**

सकाळी ५ वाजता उठलो. सकाळीच स्नान करून घेतले व विनोदच्या आईने करून दिलेला पुरीभाजीचा डबा घेऊन ७।। वाजता प्रयाण केले. देवरा गावापर्यंत विनोद सोबत होता. सायकलवर माझी सॅक होती. दिंडोरीजवळ तो उजवीकडे वळला व मी पक्क्या रस्त्याने मुंडकीकडे निघालो. जोगी टिक ते देवरा सरळ सडकेने दूर आहे म्हणून शेताडीमधून आम्ही वाट काढत अंतर कमी केले.

मंडळीपुढे रस्ता उजवी शाखा धरून धानामार सडक धरली. वाटेत एका (मामा : जमीलखान भाचाः सगीरखान) मुस्लिम घरात पाणी प्यायलो व आग्रहामुळे आणि चालेल म्हणून चहा घेतला. बारा वाजता 'नर्मदे हर' चा गजर ऐकून, सावली पाहून थांबलो आणि तिथेच डबा खाल्ला. दुखीलाल हा आजोबा (६६ वर्षे) नातवंडाना सांभाळत बसला होता. कारण सर्व मंडळी शेतावर होती.

सध्या इथे सर्वत्र नांगरणी सुरू आहे. भाताचे पीक कापून खळ्यात साठविलेले दिसते.

जमीन उपजाऊ असली तरी नदी जवळ असूनही सिंचनाची व्यवस्था नाही त्यामुळे हा भाग काळ्या सुपीक मातीचा भाग पावसावर अवलंबून आहे.

हा भाग आदिवासी आहे. लहान लहान घरे ही त्यांच्या गरीबीचे प्रकट चिन्ह आहे. बहुतांशी मजूर आहेत आणि त्यासाठी ते बाहेर जातात.

'नर्मदे हर' चे अस्तित्व असले तरी उद्घोष मात्र नाही. दिवसाबरोबर चढते ऊन त्रासदायक वाटू लागले. थोडे थांबल्यावर बरे वाटे, कारण हवा तप्त नाही. पाठीवरचे वजनही सुसह्य आहे. भोजनानंतर वाटेत दाट सावली व हिरवळ पाहून स्लीपिंग बॅग पसरली व छान विश्रांती घेतली वीस एक मिनिटे!

दुधी गाठले आणि थकलो. कारण रस्त्यांना सावली नव्हती. शेष नाग आश्रम गाठला तेव्हा हायसे वाटले. रस्त्यापासून चांगला २ कि.मी. आत मैय्याकिनारी आहे.

५। नंतर आश्रम गाठला. एका मोठ्या मोकळ्या शेणकुटीत आसन लावण्यास मिळाले. मी एकटाच परिक्रमावासी आज आश्रयाला आहे.

६। वाजता भोजन म्हणून पूजा लगेच आटोपली मुख्य साधू बाहेर गेले होते. परंतु सेवेकऱ्यांनी चहा, भोजन याची उत्कृष्ट व्यवस्था केली.

७ वाजता डायरी काढून बसलो तर ब्रह्मचारी बाबा वय वर्षे ८५, राजपूत येऊन भेटले. लग्न केलेले नाही आणि ५५ वर्षांपासून साधू जीवन स्वीकारले. आल्याबरोबर ज्याने तत्परतेने चहा दिला तो परशुराम नंतर येऊन बसला.

इथे भरपूर सर्प आहेत. पूर्वी आलेले तीन बाबाजी श्रावणात सर्पदंशाने शांत झाले. परंतु हे नवे गुरुजी आल्यापासून आम्ही हिंमतीने इथे येतो. राहतो परंतु याच वर्षी परशुरामलाही सर्पदंश झाला. परंतु वेळेवर औषधोपचार झाल्याने तो वाचला हे कळले.

एकान्तात आणि एका टोकाला असलेल्या या कुटीत मी एकटाच आहे. अंगण आणि कुटी जमीन एकाच पातळीत आहे. दहा फुटाचे प्रवेशद्वार मोकळेच आहे. काळजी घ्यायला हवी.

पसरलेले सर्व सामान नीट आवरत दूर ठेवले. थंडी नाही पण स्वेटर कानटोपी घातली आहे. स्लीपिंग बॅगचा आज प्रथम उपयोग होत आहे. रात्री निरभ्र निळ्या आकाश नक्षत्रांचा आनंद लुटला.

**– अरविंद ओक**
मानपाडा, डोंबिवली.
भ्रमणध्वनी : ०९८३३४४१५८०

●●●

अशी कोणती खोल जखम आहे की, जिचा व्रण मागे राहात नाही? – बायरन

# जागतिक मातृदिन

*'आईसारखे दैवत साऱ्या जगतावर नाही' हे सत्य सर्वमान्य आहे. निःस्वार्थ सेवाभावाचे सुंदर प्रतीक आहे, या अनुभवाला जागतिक मातृदिनाच्या निमित्ताने पुन्हा एक उजाळा देण्याचा प्रयत्न - संपादक*

भारतात 'पिठोरी अमावस्या' हा दिवस मातृपूजेचा मानला जातो आहे तो बऱ्याच प्राचीन काळापासून. मात्र मातृदिन जागतिक पातळीवर केव्हा पाळला जातो याचा शोध घेतला तर बरीच माहिती संदर्भग्रंथात मिळते. त्यानुसार थोडाफार इतिहास कळू शकतो. ग्रीक आणि रोमन यांच्या प्राचीन इतिहासात ही माहिती आहे.

रोमन लोक 'हिलरिया' नावाचा वसंतोत्सव साजरा करीत असत. त्यांच्या 'सिबिली' नामक मातृदेवतेला समर्पित असा हा वार्षिक उत्सव असे. मार्च महिन्यात साजऱ्या केल्या जाणाऱ्या या धार्मिक उत्सवात सिबिलीच्या प्रार्थनास्थळी जाऊन त्या देवतेला नैवेद्य आणि इतर भेटवस्तू भाविक भक्त अर्पण करीत असत. याशिवाय या मेळाव्यात किंवा जत्रेत विविध खेळ खेळले जात. कवायतीची जबरदस्त चित्तथरारक प्रात्यक्षिके दाखविली जात, तसेच विविध प्रकारचे मुखवटे घालून कलाकार मंडळी लोकनृत्ये सादर करीत असत. ही जत्रा तीन दिवस चालत असे. तेव्हा अनेक विक्रेत्यांना चांगली कमाई होत असे. मिठाई, खेळणी आणि कपड्यांची अनेक छोटीमोठी दुकाने लावली जात. परंतु सिबिलीच्या भक्तांचा इतरांना भलताच त्रास होऊ लागल्यामुळे त्यांना रोममधून राजाने हद्दपार केले.

भगवान येशू ख्रिस्ताची परममाता हिच्याबद्दल म्हणजे व्हर्जिन मेरीबद्दल आदर व्यक्त करण्यासाठी ख्रिस्ती पूर्वीच्या काळी 'लेंट'च्या चौथ्या रविवारी हा मातृदिन साजरा करीत असत. कालांतराने विश्वमातेकडून एकंदर सर्वच मातांकडे ख्रिस्ती धर्मप्रेमींनी आपली भक्ती वळविली आणि सर्व मातांबद्दल आदर व्यक्त करण्यासाठी याच 'लेंट'च्या चौथ्या रविवारी सर्वांना सुट्टी जाहीर करण्यात येऊ लागली. या दिवसाला 'मातृमयी रविवार' असे म्हटले जाऊ लागले. या दिवसाचाही एक इतिहास आहे, तो असा -

इंग्लंडमध्ये सोळाव्या शतकापासूनचा या विशेष दिनाचा इतिहास नोंदविला आहे. येथे दरवर्षी लेंटच्या चौथ्या रविवारी सर्व मातांचा आदर करण्यासाठी हा मातृदिन साजरा करण्यात येऊ लागला. चर्चमधील व्हर्जिन मेरीचा सन्मान करणारी रविवारीय प्रार्थना झाली की, मुले-मुली भेटवस्तू आणि फुले ठेवून स्वतःच्या आईबाबत आदर व्यक्त करीत. इथे हेही सांगणे आवश्यक आहे की, लेंट म्हणजे चाळीस दिवसीय इस्टर सणाचा काळ!

घरापासून दूर गेलेली नोकरदार मंडळी, शिकाऊ कामगार, घरगडी, माळी वगैरेंना त्यांचे मालक घरी जाऊन आपल्या आईचा सन्मान करण्यासाठी प्रोत्साहन देत असत. पारंपरिक प्रथेप्रमाणे छोटी मुलेमुली आईसाठी छोट्या छोट्या भेटवस्तू खरेदी करीत. त्याबरोबरच फ्रूटकेट किंवा फळांची पेस्ट्री किंवा सिमनेल वगैरे देऊन आईला दीर्घायुष्याच्या शुभेच्छा व्यक्त करीत. ब्रिटनप्रमाणेच युगोस्लाव्हिया या देशात अन् इतर काही देशांमध्ये मातृदिन साजरा करण्यात येऊ लागला.

हा मातृदिन साजरा करण्याची प्रथा ऐकोणिसाव्या शतकाच्या आगेमागे बंद का पडली, याचे उत्तर मिळत

ज्याला कधी जखम माहीत नसते, तो व्रणांची कुचेष्टा करतो. - शेक्सपिअर

नाही. दुसरे महायुद्ध झाले आणि काही अमेरिकन कारखानदारांनी, व्यावसायिक दृष्टिकोन समोर ठेवून 'मातृदिन' पुन्हा उत्साहाने साजरा करण्यात यावा असा विचार केला आणि या निमित्ताने भेटवस्तूंचे उत्पादन सुरू केले.

सध्या जगभर जो मातृदिन साजरा केला जातो त्याला शंभर वर्षांचासुद्धा इतिहास नाही असे दिसते. हा दिनविशेष सुरू करण्याचे श्रेय 'ज्यूलिया वॉर्ड हो' या स्त्रीला दिले जाते. दुसरी स्त्री ही ॲना जार्व्हिस! सुमारे शेहेचाळीस देशांमध्ये ही मातृपूजा केली जात असून प्रत्येक देशात वेगवेगळ्या तारखा असल्याचे दिसते. या दिवशी जगातील कोट्यवधी लोक आपल्या आईबद्दल कृतज्ञतेची भावना व्यक्त करतात. जी मुलांना जन्म देते. सांभाळून वाढवते. मायेची ऊब देते. ममतेची सावली धरते. संस्कार करून मनाची जडण-घडण करते. अभ्यास घेते. स्वतः खेळते अन् त्याच्याशी लहान होऊन खेळते. त्याच्या कल्याणासाठी झिजते. त्याच्या आजारपणात रात्रंदिवस काळजी घेते. तिचे अनंत उपकार स्मरून भेटवस्तू, भेटपत्रे देऊन मुलेमुली सत्कार करतात. मिठाई खाऊ घालतात. इतरांना देतात. स्वतः खातात. त्यावेळी आईच्या स्तुतीच्या कविता म्हणतात. गाणी गातात. आठवणी सांगतात. तो दिवस, ती रात्र धमाल रंगते. दूर दूर राहाणारे अन् फोनवरून संपर्क साधणारे नातेवाईक एकत्र येतात, तेव्हा ते एक कौटुंबिक संमेलनच ठरते.

आधुनिक मातृदिनाचा हा धागा पुन्हा एकदा ग्रीक देवतांची माता आणि क्रोनसची पत्नी 'ऱ्हिआ' हिच्यापर्यंत पुरातनकाळाशी जोडला जातो. हिचा सन्मान 'मदर्स डे' ला ग्रीक लोक करीत असत. ती कल्पना बहुधा अधिक स्वच्छ अन् स्पष्ट करून ज्यूलिया वॉर्ड हो या बाईंनी १८७२ मध्ये औपचारिकपणे मातृदिनाच्या उत्सवाची संकल्पना अमेरिकेत मांडली.

कोण होती ही ज्यूलिया?

ती होती एक देशभक्त, प्रेमळ कवयित्री, बऱ्यापैकी लेखिका आणि सेवाव्रती सामाजिक कार्यकर्ती. एवढेच नाही तर 'बॅटल हिम ऑफ दी रिपब्लिक' या तिच्या युद्धगीतामुळे ती नावारूपाला आली होती. तिने २ जून हा दिवस 'शांती दिन' म्हणून पाळण्याचे जाहीर आवाहन केले होते. हा दिवस सर्व मातांना समर्पित करण्यात यावा, असेही उदात्त विचार मांडले.

१८७० मध्ये बोस्टन या अमेरिकेच्या सांस्कृतिक शहरात तिने आपले घोषणापत्र प्रसिद्ध करून समस्त महिलांना युद्धबंदीचे आवाहन केले. तिची तळमळ निर्मळ मनाची आणि खरोखर कळकळीची होती. जूनचा दुसरा रविवार हा मातांच्या सन्मानार्थ शांतता दिवस म्हणून पाळण्यासाठी त्या कलानगरीमध्ये पुढाकार घेतला.

या निमित्ताने तिने अनेक वर्षे असे मेळावे नियमितपणे भरविले. त्या मेळाव्यात विविध मनोरंजक आणि ज्ञानवर्धक कार्यक्रमांचे आयोजन करून, मातांना अधिक प्रतिष्ठा अन् प्रेम मिळवून देण्याचे अथक प्रयत्न केले, तसेच मातृदिनाची शासनाने औपचारिक घोषणा जाहीर करावी, कायदेशीर ठराव पास करावा आणि मातृदिनाला सार्वजनिक सुट्टी जाहीर करावी, तिला मंजुरी मिळावी, यासाठी तिने बेहद्द कष्ट घेतले.

सध्या मे महिन्याच्या दुसऱ्या रविवारी मातृदिन वैश्विक स्तरावर, अनेक देशांमध्ये साजरा केला जातो. तो म्हणजे ज्यूलियाच्या कष्टांचे सुयोग्य, सुंदर फळ आहे. तिची परंपरा भक्कम पायावर स्थापित व्हावी म्हणून पुढील काळात ॲना जार्व्हिस हिने सतत पाठपुरावा केला. ॲनाचे विशेष सांगायचे तर तिने विवाह केला नव्हता. ती माता झाली नव्हती, तरीही तिला 'जागतिक मातृदिनाची माता' असे सर्वत्र संबोधले जाते! समस्त मातांचा सन्मान ॲनाला सादर समर्पित करण्यात येतो,

कोणत्याही गोष्टीची उणीव भासल्याखेरीज तिची खरी किंमत कळत नाही. - टी. फुलर

हेच तिच्या उदंड कर्तृत्वाचे संबोधन आहे, यात काहीही शंका नाही.

ॲनाला मातृदिन साजरा करण्याची प्रेरणा कुणी दिली होती?आईने! ॲना मारी जार्व्हिस हे तिच्या आईचे नाव. आईने तिला बालपणापासून मातेचे महत्त्व, तिचे थोरपण याबाबत सतत काही ना काही गोष्टी सांगून मनावर बिंबविले होते. आई होती समाजसेविका. ती जिथे जिथे समाजसेवेसाठी जायची तिथे मातृसेवेची चर्चा करायची. ती आपली इच्छा व्यक्त करायची की 'समाजासाठी, कुटुंबासाठी, मुलाबालांसाठी सदैव झिजणाऱ्या एकूण सकल मातांचा आदर करणारा आणि दिवंगत मातांना श्रद्धांजली अर्पण करणारा एक तरी दिवस आपल्या समाजाने पाळावा. यासाठी सर्वांनी विचार करायला हवा.'

मुलीने आईची ही दुर्दम्य इच्छा मनावर कोरून ठेवली. १९०५ मध्ये तिची आई ख्रिस्तवासी झाली. तेव्हा त्या मातृभक्त मुलीने आईची अंतिम इच्छा पूर्ण करण्याचा निश्चय केला. मातृदिन साजरा करण्यासाठी जनजागृती आणि शासकीय पातळीवर प्रयत्न करू लागली. अमेरिकन लोकांनी या विषयात फारशी आस्था दाखवली नव्हती, हे ती जिद्दी मुलगी विसरली नव्हती. तिने आपल्या आईच्या जीवात्म्यास शांती लाभावी म्हणून हे ध्येय गाठण्यासाठी, स्वप्नपूर्ती करण्यासाठी भरारी घेतली.

ॲनाने आईच्या सन्मानार्थ कार्नेशनची फुले वेस्ट व्हर्जिनियातील ग्राफ्टन चर्चसर्व्हिसमध्ये पाठविण्यास सुरुवात केली. ही कार्नेशनची फुले तिच्या आईला अत्यंत प्रिय होती. त्यामुळे या फुलांच्या माध्यमातून आपले प्रेम आईपर्यंत पोहोचेल, अशी तिची भाबडी भावना होती.

तिची ही उदात्त भावना अनेकांना भावली होती आणि ते तिचे समर्थक झाले होते. त्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत होती. ती आणि तिचे समर्थक हे महत्त्वाच्या पदांवर कार्यरत असलेल्या लोकांना पत्रे पाठवून मातृदिनाची सार्वजनिक सुट्टी जाहीर करावी असे विनंतरवजा निवेदन करून आपल्या या चळवळीस सहकार्य करावे असा त्यात मजकूर होता.

त्यांच्या आग्रही मागणीला आणि अथक प्रयत्नांना अखेर यश मिळाले! १९११ पासून अमेरिकेत सर्वत्र मातृदिन साजरा करण्यात येऊ लागला, तसेच ८ मे १९१४ रोजी राष्ट्राध्यक्ष वुल्ड्रो विल्सन यांनी एका संयुक्त पत्रकावर स्वाक्षरी करून, ठराव मंजूर करून घेतला आणि मे महिन्याचा दुसरा रविवार हा मातृदिन म्हणून घोषित करण्यात आला.

सध्या युरोप, अमेरिका, भारत, डेन्मार्क, फिनलँड, इटली, तुर्की, ऑस्ट्रेलिया, मेक्सिको, कॅनडा, चीन, जपान, बेल्जियम वगैरे अनेक देशांमध्ये व्यापक प्रमाणात मातृदिन साजरा केला जातो. या दिवशी सर्वाधिक दूरध्वनी, भ्रमणध्वनी आदी संपर्कमाध्यमे व्यग्र असतात. फुले, पुष्पगुच्छ, मिठाई, शुभेच्छापत्रे अथवा भेटवस्तू आईला दिल्या जातात.

आपल्या देशातही या दिवसाचे महत्त्व वाढले आहे.

**– अरविन्द दोडे**

भ्रमणध्वनी : ९८१९१९५५९२

●●●



दारिद्र्यामध्ये खितपत पडलेल्या सद्गुणी मनुष्याला या जगात लवकर पुढे यायला मिळत नाही. – डॉ. जॉनसन

# ओळख वनस्पतींची
## वाकेरी

*'ओळख वनस्पतींची' या लेखमालेतील अठरावा भाग. 'वाकेरी' या वनस्पतीची वैशिष्ट्ये, त्याचे उपयोग, त्याची देखभाल या बाबींवर या लेखात प्रकाश टाकला आहे - संपादक*

मित्रांनो, जंगलात जाताना बरेच जण काही विशिष्ट हेतू समोर ठेवून जात असतात. कुणाला जंगलातील प्राणी बघायचे असतात, कुणाला पक्षी, कुणाला फुलपाखरे तर कुणाला कीटक. मला अशीही माणसे भेटली की जंगलात ज्यांना केवळ वाघच बघायचा होता व तो दिसला नाही म्हणून निराश होत, जंगलाला दोष देत, ते आपला त्रागा व्यक्त करीत होते. केवळ झाडे बघण्यासाठी जंगलात येणारे लोक कमीच. मला वाटते असा कोणताही विशिष्ट हेतू समोर ठेवून न जाता नुसते जंगल बघायला जेव्हा आपण जातो त्यावेळी आपण पूर्वी न पाहिलेल्या कितीतरी गोष्टी पाहायला मिळतात. आधी पाहिल्या असतील तर त्या पुनःप्रत्ययाचा आनंद देतात.



दाजीपूरच्या जंगलात फिरताना मला असाच अनुभव आला. एका मोठ्या झाडाच्या बुंध्याजवळील झुडुपामधून ३० सें.मी. लांबीचे लाल पिवळ्या रंगाचे मक्याचे कणसासारखे दिसणारे, पण लांबोळके फुलांचे तुरे वाऱ्याच्या झोताबरोबर छान डोलत होते. त्या झुडुपावर अशी फुले यापूर्वी मी पाहिली नव्हती. माझे कुतूहल स्वस्थ बसू देत नव्हते. काट्या कुट्यातून वाट काढीत त्या फुलांच्या जवळ पोहचलो. ती फुले त्या झुडुपाची नसून त्यावर आरूढ असलेल्या वेलीची होती. ही वेल होती वाकेरीची.

वाकेरी हे नाव त्या वेलीला असलेल्या वाकदार काट्यांमुळे पडले की फुलांचे लांब तुरे शेंड्याजवळ आकड्यासारखे वाकलेले असल्यामुळे पडले, ते कळायला मार्ग नाही. मात्र दोन्ही कारणे संयुक्तीकच आहेत. वाकेरीची वेल कोरड्या तसेच दमट हवामानाच्या जंगलात आढळून येते. सह्याद्री पर्वतरांगेतील जंगलात सर्वत्र ही आढळून येते. ही वेल ५ ते २० मीटर लांब वाढते. पाच ते सात पत्रकाच्या जोड्या असलेली २५ ते ३० सें.मी. लांबीची संयुक्त पाने, पत्रकांची लांबी पाच ते सात सें.मी. व रुंदी ३ सें.मी. आकार आयताकृती. या वेलीवर खोडापासून पानांपर्यंत, एवढेच नाही तर फुलांच्या तुऱ्याच्या देठावर देखील काटेच काटे असतात. वेलीला या काट्यांचा संरक्षण तसेच झाडावर किंवा झुडुपांवर चढण्यासाठी व आपली पकड मजबूत करण्यासाठी उपयोग होतो. पानांचा रंग गर्द हिरवा, त्यामुळे झुडुपाच्या किंवा झाडांच्या पानांमध्ये सहज मिसळून गेलेली असतात. त्यामुळे वेलीवर फुले आल्याखेरीज याकडे फारसे लक्ष जात नाही.

वाकेरीवर डिसेंबर ते फेब्रुवारी दरम्यान ६० ते ७० सें.मी. लांबीचे तुरे येतात. मंजिऱ्यांच्या आकाराचे हे तुरे मक्याच्या कणसासारखे दिसणारे परंतु लांबोळके असे हे तुरे खालून वरपर्यंत निमूळते होत जाणारे व लांबीमुळे टोकावर वाकणारे. या तुऱ्यामध्ये लाल शेंदरी रंगाच्या व सभोवती स्थानापन्न झालेल्या लांबोळक्या कळ्या असतात. या कळ्या खालून वर अशा क्रमाने फुलत जातात. या शेंदरी कळ्यांमधून पिवळ्या रंगाच्या पाकळ्या बाहेर डोकावू लागतात. या पाकळ्या फुलाचे तोंड जेमतेम उघडेल इतक्याच उमलतात. पूर्णपणे उमललेले फूल कधीच दिसत नाही. त्यामुळे एकाच फुलावर खाली पुष्पपटलाच्या लालशेंदरी रंगाचा भाग व वर पिवळा धम्मक पाकळ्यांचा भाग अशा दोन रंगांची सुरेख रंगसंगती पाहावयास मिळते. हिरव्या गर्द रंगावर ही केशरी पिवळ्या रंगांची रंगसंगती फारच आकर्षक दिसते.

फेब्रुवारी, मार्चमध्ये या वेलीवर आयताकृती तपकिरी शेंगांचे घोस दिसू लागतात. ५ ते ७ सें.मी. लांब व ३ ते ४ सें.मी. रुंद असणाऱ्या या शेंगा बियांच्या ठिकाणी फुगीर व इतरत्र आक्रसलेल्या अशा दिसतात. या शेंगा बरेच दिवस वेलीवर लटकत असतात. फुलांचा बहर संपला तरी या तपकिरी शेंगा वेलीचे सौंदर्य आपल्या परीने जपण्याचा प्रयत्न करतात. या शेंगा कडक उन्हात तडकून बिया सर्वत्र विखुरतात. काही शेंगा मात्र बरेच दिवस वेलीवर लटकत असतात.

वाकेरीला जायकुली किंवा वाघाटी या नावाने देखील संबोधले जाते. याच्या मक्याच्या कणसासारख्या दिसणाऱ्या फुलांच्या तुऱ्यांमुळे याला इंग्रजीत Candy corn असे म्हणतात. याचे शास्त्रीय नाव Moullava spicata असे आहे. या वेलीचे मूळ व साल हे औषधीगुण युक्त असून मूळांचा न्यूमोनियात व त्वचारोगात औषध म्हणून वापर होतो. मात्र तज्ज्ञांच्या सल्ल्यानेच उपचार करणे गरजेचे आहे. यावर अधिक संशोधन चालू असून या वेलीच्या पानांमध्ये काही विषारी द्रव्य असल्याचे आढळून आले आहे. काहीही असले तरी जंगलातील सौंदर्य वाढविणारी तसेच आपल्या काटेरी हत्याराने जंगलाचे संरक्षण करणारी वनस्पती म्हणून वाकेरीचे महत्त्व आहेच.

**– प्रकाश दुधाळकर**
एफ–२२, नीता अपार्टमेंट,
मिठागर–नवघर लिंक रोड,
मुलुंड (पू.), मुंबई – ८१.
दूरध्वनी : २१६३ ६०५२

•••

(पृष्ठ क्रमांक ८ वरून - **मूल्यवेध–७: विकासाभिमुखता**)

असे झाले तर जीवन दीनवाणे दिसणार नाही. असहाय्य असणार नाही. आत्मविश्वासाने परिपूर्ण दिसेल. उण्यापुऱ्या कुठल्याही ईश्वरदत्त सामर्थ्याने सुसज्ज झालेले असेल. मग भोवताली सर्वत्र 'आनंदवन'च निर्माण होईल. बाबा आमटेंचे उदात्त स्वप्न साकार होईल. ते म्हणतातः

सुखेच माझी मला बोचती, साहसास मम सीमा नसती,
नवीन क्षितिजे सदा खुणवती,

दूर दाट निबिडात मांडला पुन्हा नवा मी डाव, माणूस माझे नाव, माणूस माझे नाव;

दहा दिशांच्या रिंगणात ह्या पुढेच माझी धाव, माणूस माझे नाव, माणूस माझे नाव.

–ज्वाला आणि फुले, बाबा आमटे

**– नरेंद्र गोळे**
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) – ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

# सुभाषित
# खरा मित्र

*खऱ्या मैत्रीची लक्षणे सांगणारे भर्तृहरीचे सुभाषित – संपादक*

पापान्निवारयति योजयते हिताय
गुह्यं च गुहति गुणान् प्रकटीकरोति।
आपद्गतंच न जहाति ददाति काले
सन्मित्र लक्षणमिदं प्रवदन्ति सन्ताः।।

'Friend in need is friend indeed' अशी एक इंग्रजी म्हण आहे. गरजेला धावून येणारा तो खरा मित्र असा याचा आशय. 'गरज' हा एक महत्त्वाचा निकष कुठल्याही नात्याच्या मुळाशी असतो. अगदी ॲरिस्टॉटलने माणसाला समाजशील प्राणी (Social animal) म्हटलं याचं कारण माणसाला एकत्र येऊन समूहाने राहण्यात सुरक्षित वाटू लागलं व या निकषावर अनेक लोक एकत्र येऊन 'समाज' नावाच्या संकल्पनेची निर्मिती झाली.

भारतीय सुभाषितकारांनी 'मित्र' या संकल्पनेकडे अत्यंत तात्विक व डोळस दृष्टीकोनातून पाहिलं. वरील श्लोक चांगल्या मित्राची लक्षणे विशद करतो. खरा मित्र हा व्यक्तीला (पापान्निवारयति) पापापासून परावृत्त करतो. वाईट गोष्टींपासून दूर करणारा खरा मित्र आजच्या व्यसनाधिनतेच्या जगात अत्यंत आवश्यक आहे. पापापासून दूर करवून (योजयतेहिताय) मित्राला हितकर गोष्टींमध्ये रस निर्माण करतो तो खरा मित्र. माऊलींनी पसायदानात म्हटल्याप्रमाणे वाईटांचा वाईटपणा नष्ट होऊन त्यांची सत्कर्मामध्ये रती वाढवणे ही मैत्रीची खरी परिसीमा आहे. आपल्या मनातलं गुपित मनात ठेवून (गुह्यं च गुहति) तो आपल्या चांगल्या गुणांना प्रकट करतो (गुणान् प्रकटीकरोति). कुठल्याही मैत्रीत काही गुपितं ही जपून ठेवायची असतात. मात्र आपल्या मित्राचे चांगले गुण समाजापर्यंत पोचवणे हे चांगल्या मित्राचे लक्षण.

अडचणीच्या वेळेला न सोडून जाता त्याला सर्वतोपरी मदत करणे ही मैत्रीची खरी कसोटी आहे. खऱ्या जीवलग मित्राची हीच खूण आहे, जो काहीही चूक झाली तरी तुम्हाला सोडून जात नाही. ज्ञानेश्वर माऊलींनी म्हटलंय –

बाप रखुमादेवीवरू जीवीचा जिव्हाळा
काही केलीया वेगळा न हो गे माये।

एकदा मित्राला स्वीकारलं की त्याला त्याच्या गुणदोषासह स्वीकारायला हवं. तो चुकला वा वाईट वागला तर त्याला सोडून जाणारा खरा मित्र नाही.

चांगल्या मैत्रीबद्दल अजून एक नितांत सुंदर सुभाषित भर्तृहरीच्या नीतीशतकात सापडतं –

जाड्यं धियो हरति सिंचति वाचि सत्यं
मानोन्नतीं नयति पापमपाकरोति।
चेतः प्रसादयति दिक्षु तनोति कीर्तिं
सत्संगतिः कथय किं न करोति पुंसाम्।।

या सुभाषितात भर्तृहरीने चांगल्या मैत्रीची लक्षणे सांगितली आहेत. आपल्या बुद्धिचे जाड्यं (मंदपणा) हरण करणारी, खरं बोलायला शिकवणारी, आपला मान वाढवणारी, पाप नष्ट करणारी, मन व बुद्धी प्रसन्न करणारी व आपली कीर्ती दाही दिशांना पसरवणारी

---

चिंता म्हणजे उसनवार दुःखावरचे व्याज. – जी. डब्ल्यू. लिऑन

अशी सत्संगती माणसाच्या कुठल्या गोष्टी पूर्ण करत नाही?

बुद्धीचा जडपणा घालवणे म्हणजे मित्राला आपल्या संगतीत आणून आपल्या वागण्याने त्याची बुद्धी प्रगल्भ करणे असा आशय आहे. खरं बोलायला शिकवणारे मित्र तर सध्याच्या जगात खूप दुर्मिळ झालेत. व्यसनाधिनतेच्या मुळाशी वाईट लोकांची मैत्री हेच कारण असते. आपलं मन प्रसन्न करणारी खरी मैत्री असते. मन व बुद्धी यांना तजेलदार बनवणाऱ्या मैत्रीबद्दल खलील जिब्रान म्हणतो –

' Your Friend is your needs answered
He is your field which you sow with love
and reap with thanksgiving

For you come to him with your hunger, and you seek him for peace.

And in the sweetness of friendship let there be Laughter, and sharing of pleasures.

For in the dew of little things the heart finds its morning and is refreshed.,

खलील जिब्रानच्या लेखी मैत्रीमध्ये सुखदुःखांचं आदानप्रदान हा महत्त्वाचा विषय आहे. Let there be laughter, and sharing of pleasures.

हात मिळवणारा प्रत्येक जण काही खरा मित्र असत नाही. बरेचदा मैत्री हा शिष्टाचार व दिखावा होऊन जातो. जागतिकीकरणाच्या तांत्रिक जगात नातं व मैत्री अधिक तांत्रिक होत जात आहे. याच दुखऱ्या नसेवर बोट ठेवलंय 'अहमद फराज' या प्रख्यात कवीने. तो म्हणतो –

तुम तकल्लुफको ही इखलास समझते हो फराज
दोस्त होता नही हर हात मिलाने वाला ...


केवळ दिखाव्यालाच खरं प्रेम मानणाऱ्या या जगात खऱ्या मैत्रीची परिभाषा कळायची असेल तर भर्तृहरीचं अजून एक सुंदर रूपक कळायला हवं. भर्तृहरीने सज्जन व दुर्जन या दोघांच्या मैत्रीतील फरक सांगितला आहे.

आरंभगुर्वी क्षयिणी क्रमेण
लघ्वीपुरा वृद्धिमतीच पश्चात्।
दिनस्य पुर्वार्ध परार्ध भिन्ना
छायेव मैत्री खल सज्जनानाम्।।

ज्याप्रमाणे सकाळपासून दुपारपर्यंत आपली सावली कमीकमी होत जाते व दुपारपासून संध्याकाळपर्यंत सावली वाढत जाते. त्याप्रमाणे दुर्जनांची व सज्जनांची मैत्री ओळखावी. अर्थात पहिल्याच भेटीत खूप घट्ट मैत्री होते व नंतर माणूस कळत जातो तसा त्याचा वीट यायला लागतो ही दुर्जनांची मैत्री याउलट हळूहळू कलेकलेने वाढत जाणारी व नात्याची वीण घट्ट होत जाणारी मैत्री हळूहळू मोठ्या होत जाणाऱ्या सावलीसारखी असून ती सज्जनांशी होते. व्यक्तीच्या गुणदोषांचे आकलन होऊन अगदी डोळसपणे होणारी सज्जनांची मैत्री व्यक्तीला जीवनाचं सार देऊन जाते. एखादा चांगला मित्र एखाद्याचं आयुष्य उजळून टाकतो. आपल्याला जगायला शिकवतो व या जगण्यावर शतदा प्रेम करायलाही शिकवतो. म्हणून तर वेदांनी म्हटलंय ''मित्रस्य चक्षुषा समीक्षामहे।''

**– प्रा. प्रशांत धर्माधिकारी**
जोशी–बेडेकर महाविद्यालय,
ठाणे
भ्रमणध्वनी – ९४२२४९५०९४

•••



# धर्मवेडामुळे झालेली शोकांतिका : औरंगजेब

*१७ व्या शतकातील मोगल बादशहा औरंगजेब ह्याच्या व्यक्तिमत्त्वाचे काही पैलू उलगडून दाखविणारा लेख*
*– संपादक*

भारतीय संस्कृती व इतिहासाविषयीचे अनेक दाखले व पुरावे आपणास उपलब्ध आहेत. विविध इतिहासकारांनी लेखी साधनांचा तसेच पुरातत्त्वीय साधनांचा वापर करून आपल्या भारताचा इतिहास लिहिलेला आहे व असा निष्कर्ष काढला आहे की, भारतीय संस्कृती व इतिहासाला जवळ–जवळ तीन हजार वर्षांपूवीपासूनचा वारसा आहे. भारताचा इतिहास सिंधू संस्कृतीपासून सुरू होतो. सिंधू संस्कृती ही त्या काळातील अतिशय प्रगत अशी नागर संस्कृती होती. ह्या संस्कृतीतील नगर रचना ही अतिशय नियोजनबद्ध केल्याचे आपणास आढळते.

सिंधू संस्कृती नंतर भारतात वैदिक संस्कृतीचा विकास झाला व त्यानंतर आजपावेतो एक अखंड अशी धार्मिक व सांस्कृतिक परंपरा भारतात अस्तित्वात आहे. वैदिक संस्कृतीच्या काळातच हिंदू धर्माचे तत्त्वज्ञान, जीवनशैली व एका विशिष्ट विचारशैलीचा विकास झालेला आपणास आढळतो. वैदिक संस्कृतीची सुरुवात झाल्यानंतर सुरुवातीला चार पवित्र वेद (ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद) तद्नंतर उपनिषदे ह्या धार्मिक साहित्याची निर्मिती झाली (काही अभ्यासकांच्या मते उपनिषदे म्हणजेच वेदांग होत). असे मानले जाते की, उपनिषदांची संख्या जवळ–जवळ दोनशेपेक्षा जास्त आहे. मात्र यातील सर्वात जुनी पहिली बाराच्या आसपासची उपनषिदं अतिशय महत्त्वाची मानली जातात व ह्या उपनिषदांना मुख्य उपनिषदे असे देखील म्हटले जाते. ब्राह्मण व अरण्यकांच्या शेवटच्या भागांमध्ये आपणास ही मुख्य उपनिषदे आढळतात. उपनिषदांनंतर दोन महाकाव्यं– महाभारत व रामायण तसेच अठरा पुराणे (विष्णू पुराण, मत्स्य पुराण, शिव पुराण, स्कंद पुराण इत्यादी) रचण्यात वा लिहिण्यात आली. ह्या सर्व ग्रंथांनी हिंदू धर्माची बैठक बसवून हिंदू तत्त्वज्ञानाच्या विकासात भर घातली. ह्यानंतर इसवी सनापूर्वी तसेच इसवी सनाच्या काळात म्हणजेच जवळ–जवळ इसवी सनाच्या १६ व्या शतकापर्यंत व त्यानंतर देखील तुरळक प्रमाणात ह्या प्रमाण हिंदू धर्मग्रंथांवर अनेक टीका व विश्लेषणे लिहिण्यात आली असे म्हणणे वावगे ठरू नये.

प्राचीन काळात म्हणजेच इसवी सन पूर्व ६ व्या शतकापासून ते इसवी सनाच्या ११ व्या शतकापर्यंत भारतामध्ये अनेक महान राजकीय घराणी होऊन गेली. यापैकी काही महत्त्वाची घराणी म्हणजे मौर्य, सातवाहन, गुप्त, वाकाटक, कलाचुरी, राष्ट्रकूट, चालुक्य इत्यादी होत. ह्या राजघराण्यांच्या काळात भारतातील सामाजिक, आर्थिक व राजकीय जीवनात सकारात्मक भर पडली यात वाद नाही. ह्या प्रदीर्घ कालावधीत भारतात बौद्ध व जैन ह्या प्रमुख धर्मांचा तर हिंदू धर्माशी निगडित अनेक पंथांचा देखील उदय झालेला आढळतो. थोडक्यात; इसवी सनाच्या ११ व्या शतकापर्यंत भारतीय समाज जीवनावर हिंदू, बौद्ध व जैन ह्या धर्मांचा व त्यांच्याशी निगडित परंपरांचा पगडा मोठ्या प्रमाणात होता.

इसवी सनाच्या ८ व्या शतकाच्या सुरुवातीस भारतामध्ये प्रामुख्याने पश्चिम भारतामध्ये एक महत्त्वाची घटना घडली व ही घटना म्हणजे मुहम्मद–बिन–कासीम

दारूण चिंता करावी एवढ्या लायकीचे मानवी व्यवहारात काहीही नसते. – प्लेटो

ह्या अरबी सेनानीने सिंध व मुल्तान ह्या प्रांतांवर केलेले आक्रमण होय. इसवी सन ७१२ मध्ये कासीम आपल्या सैन्यासह सिंध प्रांतात दाखल झाला व त्याने सिंध व मुल्तान हे प्रांत ताब्यात घेतले. मात्र, ह्या प्रांतांत मुस्लीम राजवट प्रदीर्घ काळ टिकू शकली नाही. ह्या दुर्दैवी आक्रमणामुळे राजा दहीर सेन हा सिंधचा शेवटचा हिंदू राजा ठरला. इतिहासकारांच्या मते दहिरचे राजघराणे सिंधमधील पुष्कर्ण ब्राह्मण कुळाचे होते. मुहम्मद-बिन-कासीम हा मुळचा सौदी अरेबियातील तैफ (Taif) ह्या प्रांतातील ताकिफ (Thaqif) ह्या टोळीत जन्माला आला होता. असे म्हटले जाते की, तो लहान असतानाच त्याच्या वडिलांचे निधन झाले. त्यामुळे त्याचे संगोपन व शिक्षण त्याच्या आईने केले. उमय्यद (Umayyad) खलीफांच्या कारकिर्दीत कासीमचे काका अल-हज्जज् इब्न युसुफ अल-ताकाफी (Al-Hajjaj Ibn Yusuf Al-Thaqaifi) हे प्रांताधिकारी होते. ह्या अल-हज्जज् सोबत नातेसंबंध व जवळीक आल्यामुळे सुलेमान इब्न अब्द अल-मलीक (Sulayman Ibn Abd-al-Malik) हा खलीफा झाल्यानंतर मुहम्मद-बिन-कासीम ह्याचा वध करण्यात आला.

मुहम्मद-बिन-कासीमच्या माध्यमातून भारतात पहिल्यांदा मुस्लीम आक्रमण झाले खरे, मात्र हे मुस्लीम आक्रमणकर्ते खऱ्या अर्थाने भारतात आपले पाय रोवू शकले नाहीत. इसवी सनाच्या ११ व्या शतकाच्या सुरुवातीस म्हणजेच इसवी सन १००१ मध्ये महमूद गझनी ह्या अफगाणीस्तानातील मुस्लीम राजाने भारतावर आक्रमण केले. अभ्यासकांच्या मते इसवी सन १००१ पासून येणाऱ्या काळात जवळ-जवळ सतरा वेळा महमूद गझनीने भारतावर आक्रमण केले. त्याने सध्याच्या पाकिस्तान व अफगाणिस्तानच्या सीमेलगतच्या भूप्रदेशावर राज्य करीत असलेल्या जयपाल ह्या हिंदू राजाचा पराभव केल्याचे दाखले आढळतात. एवढेच नव्हे तर ह्या गझनीने गुजरातमधील सोमनाथ मंदिराची तोडफोड व नासधूस करून तेथील दानपेटीतील द्रव्य देखील लुटून नेले. ह्या महदमूद गझनीचे मूळ नाव यामीनउद्‌दौला अबुल कासीम महमूद इब्न सबुक्तजीन (Yamin-ud-Dawla Abul Qasim Mahmud ibn Sebuktegin) असे लांबलचक होते. ह्या बहाद्‌दराने भारतावर अनेकवेळा आक्रमण करून लूट केली. मात्र ह्यावेळी सुद्धा भारतात खऱ्या अर्थाने मुस्लीम राजवट स्थापन झाली नाही. अर्थात, महदमूद गझनीचा उद्‌देश देखील भारतीय संपत्तीची लूट हाच होता.

इसवी सन ११९१ व ११९२ ह्या दोन वर्षात झालेल्या तरेनच्या लढायांनी मात्र भारताच्या वा हिंदुस्थानच्या इतिहासाला नवीन वळण दिले. ११९१ मध्ये मोहम्मद घोरी व पृथ्वीराज चौहान ह्या दोहोंमध्ये तरेनची पहिली लढाई झाली. ह्या लढाईत पृथ्वीराज चौहान या शूर रजपूत राजाने मोहम्मद घोरीचा पराभव केला. मात्र, मोहम्मद घोरीने पुढच्याच वर्षी म्हणजे ११९२ साली पुन्हा एकदा पृथ्वीराज चौहानविरुद्ध एल्गार केले व ह्यावर्षी ह्या उभयतांमधील दुसरी लढाई झाली. ह्या लढाईस तरेनची दुसरी लढाई म्हणून संबोधले गेले. ह्या लढाईत मात्र मोहम्मद घोरीने पृथ्वीराज चौहानच्या सैन्याला पराभूत केले. तरेनच्या ११९२ च्या ह्या दुसऱ्या लढाईने खऱ्या अर्थाने भारतातील मुस्लीम राजवटीचा पाया रचला.

ह्या लढाईनंतर मोहम्मद घोरीने उत्तर भारतातील प्रामुख्याने सध्याच्या वायव्य पाकिस्तानातील बराचसा भूप्रदेश, पंजाब, हरयाणा, दिल्ली हा भूप्रदेश मोहम्मद घोरीच्या व त्या अनुषंगाने मुस्लीम राजवटीच्या नियंत्रणाखाली जाण्यास सुरुवात झाली असे म्हणणे वावगे ठरणार नाही. मोहम्मद घोरीने आपल्या हिंदुस्थानातील ह्या सुभ्याचे प्रशासन पाहण्यासाठी कुत्बुद्‌दीन ऐबक ह्या इसमाची सुभेदार म्हणून नियुक्ती

कशाची तरी पूजा करत राहिल्याशिवाय कुठल्याही माणसाला चैन पडत नाही. - कार्लाइल

केली. कालांतराने मोहम्मद घोरीचा मृत्यू झाल्यानंतर त्याच्या सुभेदारांमध्ये आपले स्वातंत्र्य घोषित करून स्वतःचे स्वतंत्र राज्य निर्माण करण्याची चढाओढ सुरू झाली. कुत्बुद्दीन ऐबक हा देखील ह्या स्पर्धेत मागे नव्हता. ऐबकने स्वतःला मोहम्मद घोरीच्या हिंदुस्थानातील प्रदेशांचे सर्वेसर्वा म्हणून घोषित केले. ह्या नवीन राज्याला दिल्लीची सुलतानशाही असे संबोधले गेले. कुत्बुद्दीन ऐबकच्या मृत्यूनंतर त्याचा एकेकाळचा गुलाम व जावई अल्तमश हा दिल्लीचा सुलतान झाला व तेव्हापासून खऱ्या अर्थाने भारतात मुस्लीम राजसत्ता प्रस्थापित झाली. कुत्बुद्दीन ऐबक व अल्तमश यांच्या घराण्याला गुलाम घराणे म्हटले गेले, याचे कारण हे दोघेही एकेकाळी गुलाम होते. दिल्लीचे हे सुलतान वंशाने तुर्क होते. अशा तऱ्हेने इसवी सन १२०६ ते १५२६ ह्या ३२० वर्षांच्या कालावधीत गुलाम, खिलजी, तुघलक, लोदी इत्यादी अनेक मुस्लीम राजघराण्यांनी दिल्लीच्या सुलतान शाहीवर राज्य केले. या घराण्यांतील अनेक सुलतान वंशाने तुर्क होते तर लोदी घराणे अफगाणी म्हणजेच पठाण वंशाचे होते. पठाण हे प्रामुख्याने अफगाणिस्तानात आढळत असल्यामुळे त्यांना अफगाण देखील म्हटले जाते.

इसवी सन १५२६ मध्ये भारताच्या इतिहासातील एक अतिशय महत्त्वाची लढाई लढली गेली. ही लढाई इतिहासात पानिपतची पहिली लढाई म्हणून ओळखली जाते. ह्या लढाईने भारताच्या इतिहासाला पूर्णपणे कलाटणी दिली असे म्हणणे वावगे ठरणार नाही. ह्या लढाईमध्ये बाबरने इब्राहिम लोदी ह्या पठाण वंशाच्या दिल्लीच्या शेवटच्या सुलतानाचा पराभव केला. बाबर हा मुळचा मध्य अशियातील सध्याच्या उझबोकिस्तान ह्या देशातला. मात्र त्याने आपले तेथील वडिलोपार्जित राज्य गमावल्यानंतर तो अफगाणिस्तानात स्थिरस्थावर झाला. त्याच्या असे लक्षात आले की, अफगाणिस्तान सारख्या नापिक भूमीत त्याला व त्याच्या राज्याला काही भविष्य नाही. त्यामुळे तो हिंदुस्थानात आला व पानिपतच्या लढाईनंतर इतर मुस्लीम आक्रमणकर्त्यांप्रमाणे परत न जाता त्याने हिंदुस्थानवर (दिल्ली सुलतानशाहीच्या अखत्यारीतील भूप्रदेश) राज्य करण्याचे ठरविले. अशा प्रकारे उत्तर भारतात मुघल वा मोगल राजघराण्याच्या सत्तेची सुरुवात झाली.

बाबरानंतर त्याचा मुलगा हुमायून हा गादीवर आला. हुमायूनला काहीकाळ आपले तख्त वा सिंहासन गमवावे लागले. शेरखान नामक पठाण सरदाराने हुमायुनला यशस्वीरित्या भारतातून हुसकावून लावले. इब्राहीम लोदी हा वंशाने पठाण होता त्यामुळे भारतातील पठाण, मोगलांशी निदान सुरुवातीच्या काळात तरी शत्रुत्व बाळगून असत. त्यामुळेच मोगलांनी इब्राहीम लोदीचा पाडाव केल्यावर भारतातील पठाण मुस्लीम शेरखान ह्याच्या नेतृत्वाखाली एकत्र येण्यास सुरुवात झाली. होती. शेरखान हुमायुनचा पराभव करून शेरशहा सुरी या नावाने वा किताबाने दिल्लीचा सर्वेसर्वा बनला. ह्या काळात हुमायुन विविध राजांच्या (ज्यात हिंदू राजांचा देखील समावेश आहे) आश्रयाने भटकंतीचे जीवन जगत होता. शेवटी तो पर्शियात (सध्याचा इराण) निघून गेला व त्याला पर्शियाच्या तत्कालीन शहाने म्हणजेच राजाने (शासकाने) आश्रय दिला. एवढेच नव्हे तर हुमायुनला पुन्हा भारतात जाण्यासाठी व दिल्लीचे तख्त काबीज करण्यासाठी नकळपणे हातभार देखील लावला. पर्शियाच्या ह्या अनुभवामुळेच हुमायुन हा स्वतः सुन्नी पंथीय मुस्लीम असून देखील शिया पंथीय मुस्लीमांसाठी सहानुभूती व आस्था बाळगून होता. आपणास ठाऊकच असेल की, पर्शिया वा इराण हा मुस्लीमांच्या शिया पंथीयांचे बाहुबल्य असणारा देश आहे.एवढेच नव्हे तर हुमायुनची पत्नी हमीदाबानू बेगम ही सुद्धा शिया पंथीय होती. हुमायुन नंतर त्याचा मुलगा अकबर हा गादीवर आला. अकबराचे व्यक्तिमत्त्व व

माणसाची गरिबी अथवा श्रीमंती ही त्याच्याजवळ काय आहे यापेक्षा तो कसा आहे यावरून आजमावली जावी. -एच. डब्ल्यू. वीचर

कर्तृत्व म्हणजे एक स्वतंत्र विषय होय. ह्या व्यक्तीने भारताच्या इतिहासावर आपली कायमस्वरुपी छाप पाडली आहे. तो एक उदारमतवादी बादशहा म्हणून ओळखला जातो. त्याच्या काळात मोगल व अनेक हिंदू राजपूत घराणी यांच्यातील संबंध सुधारले व रोटी-बेटी व्यवहारदेखील सुरू झाला. धार्मिक विचारांच्या बाबतीत देखील अकबर हा बराच उदारमतवादी व लवचिक होता. त्यामुळेच कट्टरपंथीय मुस्लिमांप्रमाणे तो बिगर मुस्लिमांना 'काफर' म्हणत बसला नाही की, त्याने कुराणातील वचने वा आयत शब्दशः घेऊन त्याचे अनुकरण केले नाही. उलट अकबराने सर्व धर्मांतील चांगली तत्त्वे एकत्र करून 'दिन-ए-इलाही' नामक नवीन धर्म स्थापन करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. अकबरानंतर त्याचा मुलगा सलीम ऊर्फ जहांगीर व जहांगीर नंतर त्याचा मुलगा खुर्रम ऊर्फ शहाजहान हा मोगल सम्राट बनला. येथे एक मुद्दा मांडणे राहून गेले व तो हा की, अकबराने आपल्या कालावधीत मोगल साम्राज्याचा फार मोठ्या प्रमाणात प्रसार केला व दख्खनमध्ये (दक्षिण) अहमदनगरपर्यंत मोगलांच्या साम्राज्याच्या सीमा भिडल्या. असो. शहाजहान नंतर त्याचा मुलगा औरंगजेब हा मोगल सम्राट बनला.

औरंगजेबाचे मूळ नाव अबुल मुझफ्फर मुहीउद्दीन मुहम्मद होते. मात्र तो औरंगजेब ह्या नावाने जास्त प्रसिद्ध आहे. औरंगजेबाने जगासमोर आपले मोठेपण मिरविण्यासाठी 'आलमगीर' ही पदवी देखील धारण केलेली आढळते. आलमगीर ह्या शब्दाचा अर्थ साधारणतः सर्व विश्वावर आपली सत्ता प्रस्थापित करणारा असा होतो. औरंगजेबाचा जन्म १६१८ साली गुजराथमधील दाहोड ह्या ठिकाणी झाला. त्याच्या आईचे नाव मुमताज महल हे होते. मुमताज महलचे मूळनाव अर्जुमंद बानू बेगम असे होते व ती एका पर्शियन वा इराणी सरदार घराण्यातील होती. मुमताज महल ही शहाजहानची सर्वात प्रिय पत्नी होती. हिच्यापासूनच शहाजहानला दाराशुकोह, शहा शुजा व मुराद बख्श ही अपत्ये देखील झाली होती. हे येथे नमूद करण्याचा उद्देश हा की, पुढे जेव्हा शहाजहान आजारी पडला तेव्हा औरंगजेबाने आल्या दारा, शुजा व मुराद ह्या सख्ख्या भावांना युद्धात हरवून व वेळी त्यांचा खातमा करून सत्ता काबीज केली होती.

औरंगजेबाच्या कारकिर्दीचा मागोवा घेण्यामागचा हेतू असा की, ही व्यक्ती म्हणजे मराठ्यांच्या इतिहासातील व त्या अनुषंगाने महाराष्ट्राच्या इतिहासातील महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व होय. किंबहुना मराठ्यांचा व महाराष्ट्राचा इतिहास औरंगजेबाच्या उल्लेखाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही असे म्हणणे वावगे ठरणार नाही. औरंगजेब हा कट्टर सुन्नी पंथीय मुसलमान होता. त्याच्यावर मुस्लिमांच्या हानफी ह्या कट्टार परंपरेचा मोठा पगडा होता. इतिहासकारांचे असे म्हणणे आहे की, औरंगजेब हा अतिशय यशस्वी सम्राट होऊ शकला असता व त्याच्यात इतिहासावर आपली सुवर्ण मोहोर उमटविण्याची क्षमता होती. मात्र तो तसे करू शकला नाही व यामागचे मुख्य कारण म्हणजे त्याचा धार्मिक कट्टरपणा वा धर्मवेड होय. औरंगजेब बादशहा काफरांना (मुस्लीमेत्तर व्यक्ती) व प्रामुख्याने हिंदूंना पाण्यात पाहत असे. स्वतः मात्र 'खुदा का नेक बंदा' असल्याच्या आविर्भावात राहत असे. अर्थात, औरंगजेबाकडे न्यायबुद्धी होती यात वाद नाही व त्याची कृपादृष्टी त्याच्या प्रजाजनांवर होत होती. परंतु हिंदूंच्या दुर्दैवाने बादशहाची कृपादृष्टी लाभणारे प्रजाजन हे प्रामुख्याने मुस्लीम धर्मीय असत. औरंगजेबाच्या कारकिर्दीचा बारकाईने अभ्यास केल्यास असे निदर्शनास येते की, बादशहाने हिंदू प्रजेला, अधिकाऱ्यांना व मनसबदारांना एक न्याय तर मुस्लीम प्रजा, अधिकारी व मनसबदार यांना दुसरा न्याय दिलेला आहे. अगदी

समान प्रकारची चूक झालेली असेल तरी हिंदूंना कडक शिक्षा व मुस्लिमांकडे कानाडोळा करणे असा प्रकार बादशहाने सर्रास केलेला आढळतो. औरंगजेबाच्या ह्या पक्षपाती धोरणामुळे,नीतीमुळे वा वागणुकीमुळे अर्थातच, हिंदूंमध्ये असंतोषाची भावना बळावली गेली व याचा परिणाम म्हणून उत्तरेत रजपुतांनी बंड केले तर दख्खनमध्ये शिवाजी महाराजांसारखा तगडा वैरी निर्माण झाला. औरंगजेबावर अनेक अभ्यासकांनी व इतिहासकारांनी अभ्यासपूर्ण व संशोधनात्मक ग्रंथ लिहिलेले आहेत. भीमसेन सक्सेना, साकी मुस्तैदखान, खाफीखान इत्यादी इतिहासकारांनी त्याच्या कारकिर्दीचा इतिहास लिहिला आहे. ह्या इतिहासकारांनी लिहिलेले ग्रंथ अभ्यासकांच्या दृष्टीने फार महत्त्वाचे ठरतात. त्याचप्रमाणे सर यदुनाथ सरकार (१८७०-१९५८), रियासतकार गो. स. सरदेसाई (१८६५-१९५९), सेतुमाधवराव पगडी (१९१०-१९९४) इत्यादी १९ व्या व २० व्या शतकातील इतिहासकारांनीसुद्धा औरंगजेबाविषयी बरेच लिखाण केले आहे. सन २००३ मध्ये रवीन्द्र गोडबोले यांनी औरंगजेबावर एक अप्रतीम व सुंदर पुस्तक लिहिले आहे. गोडबोलेंच्या पुस्तकाची पृष्ठसंख्या २२८ एवढी असून त्यांच्या पुस्तकाचे शीर्षक 'औरंगजेब : शक्यता आणि शोकांतिका' असे आहे. ह्या पुस्तकाचे प्रकाशन मराठी पुस्तके प्रकाशित करणारी प्रसिद्ध अशी देशमुख आणि कंपनी (पब्लिशर्स) प्रा. लि., पुणे ह्या प्रकाशन संस्थेने केले आहे. ह्या पुस्तकाची पहिली आवृत्ती १८ जानेवारी २००३ साली आली व तद्नंतर २००६ तसेच २०१० मध्ये अनुक्रमे दुसरी व तिसरी आवृत्ती देखील निघाली. रवीन्द्र गोडबोले मुळात केमिकल इंजीनियर होते. त्यांनी १९७७ मध्ये मुंबईतील युडीसीटी (UDCT) ह्या संस्थेतून आपले शिक्षण पूर्ण केले. त्यांची पार्श्वभूमी विज्ञानाची असली तरी त्यांनी ऐतिहासिक साधनांचा व संदर्भ ग्रंथांचा संशोधनात्मकरित्या व चिकित्सक अभ्यास करून औरंगजेब व अकबर ह्या ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांवर सुरेख लिखाण केले आहे. त्याचप्रमाणे त्यांनी 'महाभारत संघर्ष आणि समन्वय' व 'इंद्राचा जन्म' ह्या पुस्तकांचे देखील लिखाण केले आहे. दुर्दैवाने ह्या उमद्या लेखकाचे ११ जून २०१४ रोजी तीव्र हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. ह्या विद्वान लेखकास ठाण्यातील विद्या प्रसारक मंडळ ह्या शैक्षणिक संस्थेच्या परिवारातर्फे तसेच डॉ. विजय बेडेकर, कार्याध्यक्ष विद्या प्रसारक मंडळ, ठाणे, प्रा. नारायण बारसे, ग्रंथपाल विद्या प्रसारक मंडळाचे के. ग. जोशी कला व ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय, ठाणे तसेच प्रस्तुत लेखाच्या लेखकातर्फे भावपूर्ण आदरांजली. वाचकांनी रवीन्द्र गोडबोलेंची पुस्तके जरूर वाचावीत.

रवीन्द्र गोडबोलेंनी आपल्या 'औरंगजेब : शक्यता आणि शोकांतिका' ह्या पुस्तकात साकी मुस्तैदखान ह्या इतिहासकाराच्या 'मासिरी आलमगिरी' ह्या औरंगजेबावरील चरित्रात्मक ग्रंथातील खालील उतारा दिला आहे तो वाचकांसाठी येथे उद्धृत करीत आहोत -

''बादशहाने आपल्या लेखणीच्या एका फटकाऱ्याने हिंदू कारकुनांना आणि कारभाऱ्यांना बडतर्फ केले. काफरांची सर्व प्रचंड देवळे आणि मंदिरे पाडून टाकण्यात आली, अगर निकामी करण्यात आली. अदूरदृष्टीच्या लोकांना हे अवघड काम कसे पार पडेल असे वाटत होते, पण बादशहाने ते काम करून दाखविल्याने लोक आश्चर्यचकित झाले.

मुसलमान होण्यासाठी अनेक काफर बादशहाकडे येत. त्यांना बादशहा स्वतः इस्लाम धर्माची दीक्षा देत असे; आणि खिलतीची वस्त्रे आणि इतर वस्तू देऊन त्यांना सफल करी.

आपल्या कारकिर्दीच्या मध्यात त्याने धर्मशास्त्रास अनुसरून हिंदूंच्यावर जिझिया कर बसविण्याचे ठरविले. त्याप्रमाणे हा कर साम्राज्यात लागू झाला. ही गोष्ट या

पूर्वी हिंदुस्थानात कधीच घडली नव्हती.

बादशहाच्या काळात हिंदूंची जितकी विटंबना झाली, तितकी यापूर्वी कधीच झाली नाही.''

वरील उताऱ्यावरून औरंगजेबाच्या धार्मिकते बाबतच्या मानसिकतेविषयी आपणास कल्पना येते. औरंगजेब हिंदूंना काफर म्हणजेच इस्लाममध्ये विश्वास न ठेवणारे व म्हणूनच दुय्यम दर्जाचे नागरिक समजत असे. औरंगजेब स्वतःला इस्लाम व पवित्र कुराणचा रक्षक मानीत असे. त्यामुळे त्याच्या दृष्टीने 'काफर' (हिंदुस्थानात, अर्थात हिंदू) हे अतिशय हीन होते. त्यामुळेच त्यांना धडा शिकविण्यासाठी त्याने अनेकदा काफरांची प्रार्थनास्थळे म्हणजेच देवळे व मंदिरे पाडण्याचा उपद्व्याप केलेला आढळतो. एवढेच नव्हे तर काफरांनी (हिंदूंनी) इस्लामचा स्वीकार करावा म्हणून तो सतत प्रयत्नशील असलेला आढळतो. ह्याबाबतीत नेताजी पालकराचे उदाहरण अतिशय बोलके आहे. नेताजी पालकर हा शिवाजी महाराजांचा अतिशय जवळचा विश्वासू सेनानी होता. नेताजी पालकरला प्रति शिवाजी असे देखील म्हटले जात असे. काहीकाळ शिवाजी महाराज व नेताजीमध्ये गैरसमज निर्माण होऊन दोघांमधील संबंध बिघडले होते. औरंगजेबाने ह्या संधीचा चांगलाच फायदा उठवला व नेताजी पालकर हा जेव्हा मोगलांच्या हाती लागला तेव्हा औरंगजेबाने नेताजीला चक्क मुस्लीम बनण्यास भाग पाडले. नेताजीचे धर्मांतर घडवून आणल्यानंतर मुहम्मद कुली खान असे त्याचे नवीन नाव ठेवण्यात आले व औरंगजेबाने ह्या मुहम्मद कुलीखानाला कंदाहार (अफगाणिस्तान) प्रांतात पठाणांचा बंदोबस्त करण्यासाठी पाठविले. ह्या घटनेनंतर जवळ जवळ एका दशकानंतर औरंगजेबाने आपल्या दिलेरखान ह्या सेनानीसोबत मुहम्मद कुली खान ऊर्फ नेताजी पालकर याला दखखनमध्ये शिवाजीविरुद्ध लढण्यासाठी पाठविले. नेताजीला जरी बळजबरीने मुस्लीम बनविण्यात आले असले तरी तो मनाने हिंदूच होता व त्याला शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्याविषयी आस्था होती. त्यामुळेच तो दिलेरखानाला गुंगारा देऊन शिवाजी महाराजांना येऊन मिळाला. शिवाजी महाराजांनीदेखील काही कर्मठ मंडळींच्या विरोधाला डावलून मुहम्मद कुली खानाला पुन्हा एकदा हिंदू धर्मात प्रवेश देण्याचे महान कार्य केले.

औरंगजेबाने केलेले अजून एक धर्मवेडे वर्तन म्हणजे हिंदूंवर लादलेला जिझिया हा कर होय. हा त्याकाळातील अतिशय जाचक कर होता. हा कर फक्त बिगर मुस्लीम जनतेकडून घेतला जात असे. ह्या मागची भूमिका अशी की, मुस्लीम राजाच्या मुस्लीम कायद्यानुसार चालणाऱ्या राज्यात कायमस्वरुपी राहावयाचे असेल तर काफरांनी हा कर राजाला दिला पाहिजे. तसे पाहता, काफरांना मुस्लीम बनवणे व ते मुस्लीम बनण्यास तयार नसतील तर त्यांना मृत्यूदंड देणे हे प्रथम पर्याय होते. मात्र, काफर जर ऐकतच नसतील व पहिल्या दोन पर्यायांचा फारसा उपयोग करता येत नसेल तर त्यांच्याकडून जिझिया हा कर वसूल करणे हा सर्वात उत्तम मार्ग होता. हिंदुस्थानसारख्या एवढ्या मोठ्या राष्ट्रात व संख्येने बहुसंख्य असणाऱ्या देशात औरंगजेबाला सर्वांना बाटवणे वा मृत्यूदंड देणे शक्यच नव्हते म्हणून त्याने 'जिझिया' कराचा सोपा मार्ग पत्करलेला दिसतो.

औरंगजेबाचे पणजोबा मोगल सम्राट अकबर ह्यांच्या व औरंगजेबाच्या धार्मिकतेबाबतच्या धोरणांची तुलना केली तर ह्या दोघांची धोरणं किती वेगळी होती हे लक्षात येते. अकबर व त्याच्यानंतर जहांगीर व शहाजहान या दोघांनीसुद्धा थोड्याफार प्रमाणात बदल करून अकबराच्या धोरणांचाच स्वीकार वा अवलंब केलेला आढळतो. औरंगजेब मात्र ह्या तिघांहून वेगळा निघाला व कदाचित त्याला आपला पणजा अकबर ह्याच्याविषयी अभिमान वाटण्यापेक्षा कदाचित त्याची लाजच वाटली

असावी असे म्हणणे वावगे ठरू नये. औरंगजेबाने आपल्या राजकारभारात मुल्ला, मौलवी व काझींना वाजवीपेक्षा जास्तच महत्त्व दिल्याचे दाखले आढळतात. अब्दुल वहाब हा काझी तर कपटी, भ्रष्टाचारी व लाचखाऊ म्हणून कुप्रसिद्ध होता तरी त्याच्यावर औरंगजेबाची कृपादृष्टी होती.

एकदा शिवाजी विरुद्ध पाठविण्यासाठी सेनापतीची निवड करताना औरंगजेबाने अब्दुल वहाब ह्या काझीचा सल्ला मागितला. तेव्हा दरबारातील महाबतखान हा स्पष्टवक्ता मनसबदार कुत्सितपणे म्हणाला, 'शिवाजीविरुद्ध सैन्य कशाला पाठवायचे? आपल्या काजीमहाशयांनी एक फतवा काढला तरी काम होऊन जाईल' ('औरंगजेब शक्यता आणि शोकांतिका', लेखक रवीन्द्र गोडबोले, पृष्ठ ७३)

औरंगजेबाच्या व्यक्तिमत्त्वाच्या निदान धार्मिक विचारांच्या अगदी उलट व्यक्तिमत्त्व हे शिवाजी महाराजांचे होते. शिवाजी महाराजांचा जन्म इसवी सन १६३० मध्ये शिवनेरी किल्ल्यात झाला. त्यांचे वडील शहाजीराजे आदिलशहा (विजापूर) व निजामशहा (अहमदनगर) च्या दरबारातील जहागीरदार होते. शिवाजीराजे म्हणजे १७ व्या शतकातील एकंदरीतच भारताच्या इतिहासातील अतिशय महान व्यक्तिमत्त्व होय यात वाद नाही. शिवाजी महाराजांनी १७ व्या शतकात तत्कालीन मुस्लीम राजवटींविरुद्ध यशस्वी बंड करून आपल्या स्वतंत्र राज्याची निर्मिती केली. ही घटना भारताच्या येणाऱ्या काळाला व इतिहासाला कलाटणी देणारी ठरली. शिवाजी महाराज हे अक्षरशः भारताच्या इतिहासातील एक अद्‌भूत व्यक्तिमत्त्व होय. त्यांच्यातील पराक्रम, दूरदृष्टीपणा, मुत्सद्‌दीपणा, शौर्य, शत्रुच्या हातावर अगदी प्रतिकूल परिस्थितीत सुद्धा तुरी देऊन पसार होण्याची किमया ह्या सर्व गुणांमुळे मोगल सैनिक शिवाजी महाराजांचा उल्लेख 'सैतान' असा करत व त्यांना सैतानी व भुताटकीच्या शक्ती वश असल्याचे म्हणत. त्यामुळे शिवाजी महाराजांचे नाव काढताच मोगल सैनिकांचा थरकाप उडत असे. ह्या गोष्टीचा पुरावा म्हणजे औरंगजेबाचा मामा शाईस्तेखान याची महाराजांनी लाल महालात रात्रीच्या वेळी शिरून छाटलेली बोटे व आग्ऱ्याहून औरंगजेबाच्या नजरकैदेतून स्वतःची करून घेतलेली सुटका ह्या दोन घटना होत.

शाईस्तेखानाला स्वप्नातसुद्धा वाटले नसेल की शिवाजी व त्याचे मावळे मोगलांच्या भक्कम बंदोबस्त असलेल्या विशाल छावणीतून लाल महालापर्यंत अशाप्रकारे पोहोचतील. याचे कारण, पुणे शहरात जागोजागी मोगलांचे सामर्थ्यशाली सरदार व मनसबदार आपापल्या सैन्यासह शाईस्तेखान व त्याच्या जनानखान्याचे रक्षण करण्यास सज्ज होते. स्वतःची बोटे छाटून घेणारा शाईस्तेखान निदान काही काळ तरी संपूर्ण हिंदुस्थानभर विनोदाचा विषय बनला होता. त्याला त्या काळात काहीक्षण तरी नक्कीच वाटले असेल की, त्याची बोटे तुटण्यापेक्षा शिवाजीच्या हस्ते त्याचा जीव गेला असता तर बरे झाले असते. औरंगजेबाची ह्या घटनेनंतर आपल्या मामावर खप्पा मर्जी झाली व त्याने आता शाईस्तेखानाकडून विवेकपूर्ण कृतीची अपेक्षा नाही अशा स्वरुपाचे वा आशयाचे उद्‌गार काढून ह्या बोट तुटक्या शाईस्तेखानाची रवानगी बंगालच्या सुभ्यावर केली. येथे एक गोष्ट नमूद करण्यासारखी आहे व ती म्हणजे ही की, औरंगजेब हा मोगल सम्राट बनण्यामध्ये शाईस्तेखानाचा खरोखरच सिंहाचा वाटा होता. औरंगजेब जेव्हा दख्खनचा सुभेदार होता तेव्हा त्याचा मोठा भाऊ दाराशुकोह हा दिल्लीत आपला बाप शहाजहान सोबत राज्यकारभारत लक्ष घालत असे, औरंगजेबाच्या दृष्टीने हस्तक्षेप करीत असे. ह्यावेळी शाईस्तेखान औरंगजेबाला नेहमी दिल्लीत मोगल दरबारात घडणाऱ्या सर्व घडामोडींची इत्यंभूत माहिती देत असे. एवढेच नव्हे तर शहाजहान

आजारी पडल्यानंतर मोगल राजपुत्रांमध्ये वारसाहक्कासाठी झालेल्या धुमश्चक्रीत शाईस्तेखानाचा औरंगजेबाला संपूर्ण पाठिंबा होता. अशा ह्या आपल्या प्रिय मामावर शिवाजीने केलेल्या मानहानीकारक हल्ल्यामुळे औरंगजेब खूप नाराज झाला होता.

शिवाजी महाराजांची आग्रा भेट व त्यांनी तेथील नजरकैदेतून करून घेतलेली सुटका म्हणजे विश्वास न बसणारी दंतकथा वाटते. मिर्झाराजा जयसिंग ह्या मोगल दरबारातील मनसबदारासोबत पुरंदरच्या वेढ्यानंतर तह करून शिवराय आगऱ्याला औरंगजेबाच्या दरबारात जाऊन बादशहाची भेट घेण्यास तयार झाले. मात्र, तेथे दरबारात मानापमानाच्या मुद्द्यावरून झालेल्या अपमानामुळे शिवाजी महाराज नाराज झाले. त्यामुळे औरंगजेबाने शिवरायांना तात्काळ नजरकैदेत ठेवण्याचे आदेश दिले. त्यांच्याभोवती जयसिंगाचा मुलगा रामसिंग व आगऱ्याचा कोतवाल शिद्दी पोलादखान ह्याच्या सैनिकांचा गराडा होता. शिवरायांनी मात्र ह्या सर्व सुरक्षा व्यवस्थेचा कवच भेदून मोगल बादशहाच्या कैदेतून सुटका करून घेतली व औरंगजेब व त्याचे विशाल सैन्य शिवरायांच्या युक्तीसमोर व बुद्धीसमोर किती क्षुल्लक आहे हे दाखवून दिले. ह्या घटनेनंतर मोगल सैन्यातील शिवाजीला जादूटोणा येतो व त्याला सैतानी ताकद वश आहे ह्या अंधश्रद्धेला तर अजूनच बळकटी आली.

शिवरायांची राजा म्हणून महती पटवून देण्यासाठी रवीन्द्र गोडबोल्यांनी आपल्या 'औरंगजेब : शक्यता आणि शोकांतिका' ह्या अभ्यासपूर्ण पुस्तकात महाराष्ट्रातील प्रसिद्ध विद्वान व विचारवंत प्रा. नरहर कुरुंदकरांनी रणजीत देसाई लिखीत 'श्रीमान योगी' ह्या शिवरायांवरील कादंबरीच्या प्रस्तावनेत शिवाजी महाराजांबद्दल नोंदविलेले मत उद्धृक्त केले आहे. कुरुंदकरांचे हे मत वाचल्यावर शिवरायांचा महानपणा व एक राजा म्हणून असलेले एक श्रेष्ठत्व निर्विवादपणे सिद्ध होते. सदर परिच्छेद 'औरंगजेब : शक्यता आणि शोकांतिका' ह्या पुस्तकात प्रस्तावनेच्या स्वरुपात लिहिलेल्या 'शक्यता' ह्या सदराखालील पृष्ठ क्रमांक 'एकतीस' वर आलेला आहे. हा उतारा खालीलप्रमाणे आहे –

'शिवाजीची मनोभूमिका व वागणे पाहिले, म्हणजे अर्थशास्त्रात कौटिल्याने कल्पिलेला राजा कौटिल्यानंतर दोन हजार वर्षांनी साकार झाला आहे असे वाटू लागते. कौटिल्याच्या कल्पनेतील राजा हेरगिरीवर भर देणारा, आक्रमणाचे लाभ स्वतःच्या पदरात पाडून घेणारा, गरजेनुसार तह करणारा, मोडणारा, प्रजारक्षणासाठी सदैव दक्ष, आवश्यक तर घातपात करणारा पण विलासशून्य, उपभोगशून्य, न्यायी व धर्मश्रद्ध असा आहे. चारित्र्यवानांखेरीज इतरांना राजदंड पेलणार नाही, असे कौटिल्याला वाटते. शिवाजी हा याही संदर्भात समजून घेण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.'

नरहर कुरुंदकरांनी खरोखरीच मोजक्या शब्दात व फक्त एका परिच्छेदात शिवाजी राजांची एक राजा म्हणून असलेली हुबेहूब प्रतिमा वाचकांसमोर उभी केली आहे. ह्यालाच तर आपण प्रतिभा म्हणतो. नरहर कुरुंदकर खरोखर महाराष्ट्र देशाला लाभलेले एक श्रेष्ठ नररत्न व विचारवंत होते यात वाद नाही. असो, वरील विवेचनावरून महाराज किती व्यावहारीक व प्रजेचे रक्षण करणारे राजे होते हे आपल्या लक्षात येते. त्यामुळेच त्यांच्या रुपाने औरंगजेबाचे मनसुबे उधळणारा एक ताकदवान प्रतिस्पर्धी औरंगजेबासमोर उभा ठाकला. ह्या प्रतिस्पर्ध्याने आपल्या हयातीत औरंगजेबाला सडेतोड उत्तर तर दिलेच मात्र त्याच्या भविष्यातील सर्व धोरणे व रणनीतींवर व प्रामुख्याने भारताचे इस्लामीकरण करण्याच्या महत्त्वाकांक्षेवर पाणी फिरविले. शिवरायांनी आपल्या हयातीतच औरंगजेबाला लढा दिला नाही तर मराठा राष्ट्राची अस्मिता जागृत करून त्यांना महाराजांच्या पश्चात देखील औरंगजेब व अफाट मोगल सैन्याविरुद्ध

जगाला खऱ्याखुऱ्या थोर अशा पुरुषांच्या अस्तित्वाची जाणीवही नसते. – सर एच. टेलर

लढण्याची प्रेरणा दिली. त्यामुळेच १८ व्या शतकात कर्तबगार पेशव्यांच्या नेतृत्वाखाली मराठी सेना अटकेपार झेंडे रोवू शकली असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

औरंगजेबाच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू आहेत. औरंगजेब जरी धार्मिकदृष्ट्या कट्टर होता तरी तो शूर, धाडसी व साध्या राहणीमानात विश्वास असणारा बादशहा होता असे म्हणणे निश्चितच संयुक्तीक ठरावे. विविध अभ्यासकांच्या लिखाणात असे संदर्भ आले आहेत की, औरंगजेब हा स्वहस्ते टोप्या बनवून त्या विकून स्वतःचा उदरनिर्वाह चालवित असे. ही बाब वेगळी की, त्याचे उमराव बादशहाने बनविलेल्या टोप्या चढ्या भावाने विकत घेत! औरंगजेबाची इस्लाम निष्ठा एवढी जबरदस्त होती की, त्याला संपूर्ण कुराण मुखोद्गत होते. त्याची धर्मनिष्ठा व साधी राहणी यामुळे त्याला अनेकजण 'आलमगीर जिंदा पीर' म्हणून संबोधत असत. पीर म्हणजे साधारणतः साधुपुरुष असा अर्थ होतो.

रवीन्द्र गोडबोलेंचे 'औरंगजेब : शक्यता आणि शोकांतिका' हे पुस्तक एवढे वाचनीय व अभ्यासपूर्ण झाले आहे की, त्यांच्या पुस्तकातील संदर्भ व परिच्छेद उद्धृक्त कारण्याचा मोह आवरत नाही. औरंगजेबाच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकणारे वा त्याचे व्यक्तिमत्त्व समजण्यासाठी उपयोगी ठरणारे रवीन्द्र गोडबोलेंच्या पुस्तकात निकोलाय मनुची (इटालीयन वंशाचा मिर्झाराजा जयसिंगाच्या सेवेतील अधिकारी), इतिहासकार सर यदुनाथ सरकार व ज्येष्ठ विचारवंत नरहर कुरुंदकर यांचे औरंगजेबाविषयी आपली मते व्यक्त करणारे व निरीक्षणे नोंदविणारे परिच्छेद खाली अनुक्रमे देत आहोत.

'एकदा बादशहाने जुल्फिकारखानास मराठ्यांवर पाठविताना कानमंत्र सांगितला तो असा; हे पाहा, शत्रूशी प्रसंग पडला असता कपट, खोटे बोलणे, धरसोड, खोट्या शपथा इत्यादी वाट्टेल तो प्रकार प्रसंगानुसार उपयोगात आणण्यास कमी करू नकोस. नाही नाही त्या युक्त्या व लबाड्या योजित जा. पण हातात घेतलेल्या कामात यश मिळविल्याखेरीज राहू नकोस...'

'लोक आपले हुकूम मानीत नाहीत हे बादशहास ठाऊक, म्हणून तो स्वतः लढाईवर गेला. सदासर्वकाळ ईशचिंतनात निमग्न आहोत, असे तो दाखवितो. रमजानच्या उपवासात जमिनीवर डोके टेकून सारखे चोवीस तास भजन म्हणत असतो. मग राणी उदयपुरी जवळ जाऊन त्यास उठविते, तेव्हा राग आल्यासारखे दाखवून म्हणतो, 'माझ्या परमानंदात तुम्ही व्यत्यय का आणता? मला (आता) इहलोकाचे सुख पुरे झाले.' अशा वर्तनाने भोळ्याभाबड्या चित्तास वाटू लागते, की बादशहा खरोखर मोठा सत्पुरुष आहे.'

निकोलाय मनुचीने वरील नोंद त्याच्या 'स्टोरिया डि मोगोल' या ग्रंथात केली आहे. यावरून लक्षात येते की, औरंगजेब वेळ पडल्यास आपले कार्य पूर्ण करण्यासाठी कपट, खोटारडेपणा, साम, दाम, दंड, भेद इत्यादी सर्व नीतींचा अवलंब करण्यासाठी मागेपुढे पाहणारा नव्हता. त्यामुळे शिवाजीने त्याच्याविरुद्ध वापरलेली रणनीती योग्यच होती हे सिद्ध होते. तसेच औरंगजेबाच्या म्हातारपणात त्याचे सरदार व सैनिक त्याच्या आज्ञांची थोड्याफार प्रमाणात तरी अवज्ञा करीत होते हे देखील लक्षात होते व त्यामुळेच हा वृद्ध बादशहा आपल्या जीवनाच्या शेवटच्या काळात जास्तच धार्मिक झालेला आढळतो.

सर यदुनाथ सरकार ह्या प्रसिद्ध इतिहासकाराने आपल्या 'ए शॉर्ट हिस्टरी ऑफ औरंगजेब' ह्या ग्रंथात औरंगजेबाविषयी खालील आशयाची टिप्पणी केली आहे,

'औरंगजेबाच्या अंगात विलक्षण असे शौर्य वास करीत होते. त्याचा त्याच्या स्वभावावर असलेला

---

विचारी पुरुषांना हे जग एक सुखान्तिका वाटते, तर भावनाप्रधान माणसांना तेच जग एक शोकान्तिका वाटते. - एच. वॉलपॉल

विलक्षण संयम, अतिशय भयानक अशा संकटात आल्यावर देखील उत्तेजनपर शब्द बोलण्याची त्याला साधलेली किमया आणि धर्मत आणि खाजवा येथे मृत्युशी त्याने बेदरकारणे दिलेली झुंज या गोष्टी हिंदुस्थानच्या इतिहासात अतिशय मानाचे स्थान औरंगजेबाला देऊन गेल्या आहेत. औरंगजेब हा बहुश्रूत आणि तोलून-मापून बोलणारा विद्वान होता. थोर राजकारणी पुरुष म्हणून औरंगजेबाची गणना निश्चितच करता आली नसती. त्याची लायकी फार तर एखाद्या कसबी विभागाचा प्रमुख म्हणून नियुक्त केली जाण्याएवढीच होती.'

सर यदुनाथ यांचे औरंगजेबाविषयीचे वरील विवेचन आपणास औरंगजेबाविषयी अनेक गोष्टी सांगून जातात. औरंगजेबामध्ये एक महान सम्राट बनण्याचे सर्व गुण होते. मात्र, त्याने आपली बुद्धीमत्ता, सत्ता व कौशल्य फक्त काही धार्मिक कर्मठ लोकांना खुश करण्यासाठी वाया घालविले. त्याला आपला पणजोबा अकबर ह्याच्या धोरणांचा विसर पडला ही बाब त्याच्या दृष्टीने सर्वात महाग पडली.

नरहर कुरुंदकरांनी रणजीत देसाई लिखित 'श्रीमान योगी' या कादंबरीला जी प्रस्तावना लिहिली आहे त्या प्रस्तावनेतील काही भाग रवीन्द्र गोडबोलेंच्या पुस्तकातून घेऊन खाली उद्धृक्त केला आहे,

'आलमगीर म्हणजे धर्मवेडा पिसाट पुरुष नाही. तो पुरेसा क्रूर होता. पण तसाच युद्ध तज्ज्ञ, राज्यकारभार प्रवीण, धूर्त व संथ होता. कर्तबगार, चाणाक्ष आणि व्यवहारवादी होता. औरंगजेब जे करीत होता ते पिसाट धर्मवेड नव्हते. ज्या नेत्यांचा तो प्रतिनिधी होता, त्यांचे वर्चस्व टिकविण्याचा तो निर्णायक लढा होता. अशा निर्णायक लढ्यात तडजोड शक्य नसते. औरंगजेबाचा पराभव हा त्याचा पराभव नव्हता. गझनीपासून त्याच्यापर्यंतच्या इस्लामविजयाचा तो शेवट होता. हा औरंगजेब आपण कधी समजून घेत नाही. म्हणून शिवाजी आपल्याला समजत नाही.'

कुरुंदकरांच्या विवेचनावरून आपणास औरंगजेब ह्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू लक्षात येतात. त्याचे वेडेपण हे काही कोण्या खुळ्याचे नव्हते तर अगदी चित्त ठिकाणावर ठेवून विचारपूर्वक केलेली ती एक चाल होती. कदाचित, मुस्लीम राज्यकर्त्यांचे राज्य असणाऱ्या देशात काफरांची संख्या जास्त आहे असे शल्य त्याच्या मनात असावे. हिंदुस्थान पूर्णतः इस्लाममय बनवणे हे औरंगजेबाचे स्वप्न असावे. मात्र, त्याच्या ह्या स्वप्नपूर्तीतील सर्वात मोठा अडसर व अडथळा दख्खनेतील मराठ्यांची सत्ता होती हे त्याने ताडले. त्यामुळेच १६८२ मध्ये औरंगजेब जातीने इस्लामच्या मार्गातील एकमेव अडसर, म्हणजेच मराठ्यांना उखडून टाकण्यासाठी दख्खनेत उतरला. औरंगजेबाला सुरुवातीस वाटले की, आपण जातीने दख्खनमध्ये गेल्यावर त्याच्या सैन्याचे मनोबल वाढेल व मराठ्यांचा पाडाव शक्य होईल. नेमका येथेच औरंगजेब चुकला. मराठ्यांच्या मनात शिवाजी महाराजांनी निर्माण केलेली प्रेरणा, अस्मिता, स्वधर्म प्रेम व लढाऊ बाणा ह्यांच्यासमोर औरंगजेब क्षुल्लक ठरेल हे निदान सुरुवातीस तरी त्याच्या डोक्यात आले नसेल. त्यामुळे औरंगजेब मराठा राष्ट्रात त्यांना जिंकण्यासाठी आला खरा मात्र मराठ्यांना न हरवताच तो १७०७ मध्ये वयाच्या ९० व्या वर्षी इहलोकातूनच निघून गेला. औरंगजेबासारख्या मातब्बर बादशहास हरवणाऱ्या मराठ्यांच्या शक्तीची व युद्ध कौशल्याची झलक यावरून दिसते.

औरंगजेबाचे पर्शिया (सध्याचा इराण) च्या सम्राटांबरोबर अतिशय तणावपूर्ण संबंध होते. याचे कारण औरंगजेब स्वतःस तुर्की वंशीय मानत असे व तो कट्टर सुन्नी पंथीय मुस्लीम होता. याउलट पर्शियाचे

सम्राट इराणी वंशाचे असून शिया पंथीय मुस्लीम होते. शिया व सुन्नी यांच्यामधून विस्तवसुद्धा जात नाही. अगदी आजच्या काळातसुद्धा मुस्लीमांच्या ह्या दोन पंथांमध्ये बऱ्यापैकी बेबनाव असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे १७ व्या शतकात तर हा बेबनाव अजूनच खूप जास्त प्रमाणात होता. औरंगजेबाच्या काळात हिंदुस्थानात शिया व सुन्नींच्या दरम्यान दंगली झालेले दाखलेसुद्धा आढळतात. इराणच्या तत्कालीन बादशहाने 'तुमची आलमगीर (जग ताब्यात घेणारा) ही पदवी काढून टाकून पिदरगीर (बापाला ताब्यात घेणारा) ही पदवी धारण करा' असे औरंगजेबाला म्हटल्याचा दाखला सेतुमाधवराव पगडी यांनी आपल्या 'श्री छत्रपती नि त्यांची प्रभावळ' या पुस्तकातील 'मोगल घराण्यातील अश्वत्थामा : औरंगजेब' ह्या लेखात दिला आहे. ह्या एका वाक्यावरून पर्शिया व औरंगजेब कालीन हिंदुस्थानचे आपापसांतील संबंध कशाप्रकारचे असतील हे लक्षात येते.

औरंगजेबाला आपले शिक्षण व्यवस्थित झाले नाही वा राजपुत्रांना ज्या तोडीचे शिक्षण द्यायला हवे ते देण्यात आले नाही असे वाटत असावे व त्याची बोच त्याच्या मनात होती. सेतुमाधवराव पगडींच्या वरील नमूद केलेल्या पुस्तकातीलच (श्री छत्रपती नि त्यांची प्रभावळ) लेखातील खालील उतारा खूप बोलका आहे व औरंगजेबाच्या मनातील त्याला प्राप्त झालेल्या शिक्षणाविषयीची खंत स्पष्ट करते. तर, हा उतारा खालीलप्रमाणे आहे,

'औरंगजेबाचे शिक्षण कट्टर मुल्ला-मौलवींच्या देखरेखीखाली झाले असले पाहिजे. राजकारणाचे, इतिहासाचे, शासनाचे जे आणि जशा प्रकारचे शिक्षण राजपुत्रांना द्यायला हवे तसे आपल्या शिक्षकांनी आपल्याला दिले नाही. उलट मला अनावश्यक असलेले अरबी व्याकरण माझ्यावर लादण्याची पराकाष्ठा केली, अशी अत्यंत कटू शब्दांत औरंगजेबाने आपल्या शिक्षकाची कानउघडणी केली आहे. मनुचीने आपल्या आत्मचरित्रात सगळाच मजकूर तपशिलाने दिला आहे. कानउघडणी करूनच औरंगजेब थांबला नाही, त्याने त्या शिक्षकाला 'दिलेली पेन्शन खात आपल्या गावात जाऊन पडून राहा, पुन्हा दरबारात येऊ नका. अशा शब्दांत तंबी दिली.'

औरंगजेब हे खरोखरच मध्ययुगीन भारतातील ठळकपणे जाणवणारे राजकीय व्यक्तिमत्त्व होय. ह्या व्यक्तीच्या ठायी जेवढे चांगले गुण तेवढेच धार्मिक कडवटपणा होता. शेवटी त्याच्या ह्या धार्मिक वेडामुळेच मराठ्यांच्या हातून त्याचा व त्याच्या राजघराण्याचा पाडाव झाला. एवढेच नव्हे तर, ज्या मराठ्यांचा पराभव करण्यासाठी औरंगजेब जंग जंग पछाडला होता त्याच मराठ्यांवर विसंबून राहण्याची वेळ औरंगजेबाच्या वंशजांवर १८ व्या शतकात आलेली दिसते. औरंगजेबाने आपला पणजोबा अकबरासारखा दूरदृष्टीपणा दाखविला असता तर निश्चितच तो एक महान सम्राट बनू शकला असता, नव्हे एक महान सम्राट बनण्याचे गुण त्याच्याकडे होते असे म्हणणे वावगे ठरणार नाही. त्याने धार्मिक कर्मठपणाची केलेली चूक त्याला खूप महागात पडली व त्याच्यावर आयुष्याच्या संधेस महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यात हिंडताना व मराठ्यांच्या भीतीखाली त्याचे सैन्य सदैव वावरत असताना 'अल्लाह आता काफरांचाच मदतगार आहे असे मला वाटू लागले आहे' असे म्हणण्याची वेळ आली.

औरंगजेबाला आपण तैमूरलंग ह्या तुर्क राजाच्या वंशातले आहोत याचा खूप अभिमान होता. मोगलांची सत्ता १५२६ साली भारतात स्थापन करणारा औरंगजेबाचा पूर्वज बाबर हा आपल्या वडिलांकडून तैमूरलंग तर आईकडून खुंखार मंगोल योद्धा चिंगीज खान यांचा वंशज होता. म्हणूनच औरंगजेबाचा तैमुरलंगाशी नातेसंबंध होता यात वाद नाही. तैमुरलंग

हा एका पायाने लंगडा वा त्याच्या पायात व्यंग होते. त्यामुळेच त्याला लंग म्हणजे व्यंग असलेला (पायात) म्हणत असत. औरंगजेबदेखील आपल्या आयुष्याच्या शेवटच्या काळात लंगडा झाला होता. त्याचे झाले असे की, महाराष्ट्रात मराठ्यांविरुद्ध लढत असताना एकदा रात्रीच्या वेळेस त्याच्या छावणीत काही कारणामुळे गोंधळ निर्माण झाला तेव्हा ह्या दुर्दैवी व म्हाताऱ्या बादशहास वाटले की, छावणीवर मराठ्यांनी हल्ला चढवला असावा; त्यावेळी अंधारात चाचपडत शस्त्र हाती घ्यायला जाऊन हा वृद्ध सम्राट पडला व त्याच्या गुडघ्याचा सांधा निखळला. त्याच्या हकीमांना तो सांधा काही परत बसविता आला नाही. त्यामुळे आपल्या जीवनाच्या अखेरच्या टप्प्यात औरंगजेबाला एका पायाने लंगडा होण्याची वेळ आली व तो आपल्या छावणीत काठीचा आधार घेऊन फिरत असे. औरंगजेबाचा स्वभाव लक्षात घेता कदाचित, आपण आपल्या महान पूर्वजाप्रमाणे (तैमूरलंग) लंगडे झालो आहोत असे वाटून त्याचा त्याला सार्थ अभिमान वाटला असेल.

अनेक इतिहासकारांच्या मते औरंगजेबाऐवजी त्याचा थोरला भाऊ दाराशुकोह हा जर हिंदुस्थानचा मोगल सम्राट झाला असता तर कदाचित भारताचा इतिहास वेगळा असता. याचे कारण दाराशुकोह हा त्याचा पणजोबा अकबर याच्याप्रमाणेच उदारमतवादी धार्मिक विचार बाळगणारा होता. त्याला विविध धर्मांच्या अभ्यासाची आवड होती. तसेच त्याने उपनिषदे, भगवद्गीता, योगवासिष्ठ आदी संस्कृत ग्रंथांचे फारसी भाषेत अनुवाद करून घेतले होते. एवढेच नव्हे तर तो अनेकदा संस्कृत पंडित, विद्वान, संन्याशी तसेच साधूंसोबत धर्मविषयक चर्चा करत असे. सेतुमाधवराव पगडी यांनी आपले 'भारतीय मुसलमान : शोध आणि बोध' हे पुस्तक दाराशुकोह ह्यास अर्पण केले आहे. ते आपल्या अर्पणपत्रात म्हणतात–

'उदारमतवादाचे प्रतीक समदर्शी राजपुत्र महम्मद दाराशुकोह याच्या पवित्र स्मृतीस...'

शेवटी नियतीचा खेळ न्याराच असतो. हिंदुस्थानच्या नियतीत वा नशीबात दाराशुकोह ऐवजी औरंगजेब हाच बादशहा बनण्याचे होते व ते हिंदुस्थानचे नशीब कोणीही बदलू शकला नाही. शेवटी जे विधीलिखित होते त्याप्रमाणे औरंगजेब हा बादशहा झाला व त्यामुळे काय इतिहास घडला हे आपणास ठाऊकच आहे. औरंगजेबाविषयी सरते शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते की, त्याच्या व्यक्तिमत्त्वात अनेक चांगल्या व दमदार गोष्टी करण्याच्या व खऱ्या अर्थाने महान सम्राट बनण्याच्या शक्यता होत्या. मात्र त्याच्या हेकेखोर स्वभावामुळे व धार्मिक वेडामुळे त्याची शोकांतिका झाली.

**संदर्भ :**


- औरंगजेब : शक्यता आणि शोकांतिका – रवीन्द्र गोडबोले
- श्री छत्रपती नि त्यांची प्रभावळ – सेतुमाधवराव पगडी
- शिवाजी अँड हिज टाईम्स् – सर यदुनाथ सरकार



**– सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**

उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख

जोशी–बेडेकर महाविद्यालय, ठाणे.

भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६

Email :subhashinscotland@gmail.com


●●●



उदार अंतःकरणाच्या माणसांना कोणतेही कार्य हीन प्रतीचे वाटत नाही. – युरिपाईड्स

# परिसर वार्ता

**- संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

### महिला दिन



दि. ८ मार्च २०१७ रोजी शाळेत इ. ६ वी ते इ. ८ वीच्या विद्यार्थिनींसाठी महिला दिन साजरा करण्यात आला. यानिमित्ताने प्रमुख पाहुण्या म्हणून महाराष्ट्र टाइम्सच्या शर्मिला कलगुटकर (वार्ताहर) यांना आमंत्रित केले होते. त्यांनी विद्यार्थिनींना एक स्त्री म्हणून स्वतःचा सन्मान कसा करायचा व त्यासाठी शिक्षणाची असलेली आवश्यकता या बाबत मार्गदर्शन केले.

### हस्तकला प्रदर्शन



दि. २१ मार्च २०१७ रोजी शाळेतील हस्तकला शिक्षिका सौ. कल्पना बोरवणकर यांनी वार्षिक हस्तकला प्रदर्शनाचे आयोजन केले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष मा. डॉ. विजय बेडेकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. प्रदर्शनात शाळेतील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या हस्तकलेच्या विविध वस्तू ठेवण्यात आल्या होत्या.

शाळेतील शिक्षक, विद्यार्थी तसेच विद्या प्रसारक मंडळातील सभासदांनी प्रदर्शनाला भेट दिली.

### क्रीडा स्पर्धा




दि. १५ एप्रिल २०१७ रोजी एन. एस. जे. शैक्षणिक व सामाजिक संस्था, ठाणे यांच्यातर्फे शिक्षकांसाठी आंतरशालेय क्रीडास्पर्धांचे आयोजन केले होते. या क्रीडास्पर्धांमध्ये पुरुषांसाठी क्रिकेट व महिलांसाठी डॉजबॉलचे सामने आयोजित केले होते. या दोन्ही स्पर्धेत शाळेतील शिक्षक सहभागी झाले होते.



काम करताना खर्च झालेला वेळ कधीही व्यर्थ जात नाही. - इमरसन

क्रिकेटमधील सहभागी शिक्षक श्री. शिंदे, श्री. देसले, श्री. शिरापुरी, श्री. विलास जाधव व व श्री. दिघे होते. तर डॉजबॉल स्पर्धेत सौ. झंझाड, सौ. चव्हाण, सौ. धोत्रे, सौ. सोनावणे, सौ. धनगर, सौ. बोऱ्हाडे, सौ. बोरवणकर व सौ. तातळे सहभागी झाल्या होत्या.

**अभिनंदन!**

दि. २१, २२, २३ एप्रिल २०१७ रोजी गडकरी रंगायतन, ठाणे येथे २९ व्या अखिल भारतीय सावरकर साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

सदर संमेलनात आपल्या शाळेतील शिक्षिका साधना जोशी यांनी सूत्रसंचालन समिती प्रमुख म्हणून जबाबदारी स्वीकारली. दोन सत्रांचे सूत्रसंचालन त्यांनी स्वतः केले. संमेलनातील त्यांच्या योगदानाची दखल घेत ज्येष्ठ लेखक, वक्ते, सावरकर साहित्य अभ्यास मंडळाचे अध्यक्ष व संमेलनाचे अध्यक्ष आदरणीय श्री. रमेश पतंगे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले.

सर्वांतर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन!

२९ व्या अखिल भारतीय सावरकर साहित्य संमेलनाच्या निमित्ताने आयोजित संमेलनपूर्व कार्यक्रमात २० एप्रिल २०१७ रोजी सहयोग मंदिर, ठाणे येथे सायंकाळी ५ वाजता 'सावरकर एक अविस्मरणीय वादळ' या एकांकिकेत आपल्या शाळेतील निखील मोरे, वेदांत जामगावकर, योगेश दामले, गणेश आणेकर, तन्मय घाडीगावकर यांनी सहभाग घेतला.

या एकांकिकेची सूत्रधार म्हणून आपल्या शाळेतील कु. ऋचा जोशी हिने भूमिका पार पाडली.

सर्वांतर्फे सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन!

**स्काऊट-गाईड शिबिर**

दि. १२ एप्रिल ते १३ एप्रिल २०१७ या कालावधीत शाळेत गाईड शिक्षिका सौ. कल्पना बोरवणकर यांनी इ. ६ वी ते ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी स्काऊट गाईड निवासी शिबिराचे आयोजन केले होते. सदर शिबिरात एकूण ५० स्काऊट गाईड उपस्थित होते.



दि. १२ एप्रिल २०१७ रोजी बालसंस्कार वर्ग व मातृशक्ती विभाग प्रमुख मा. सौ. सुमेधा बेडेकर यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन व झेंडावंदन करण्यात आले.

या दिवशी विद्यार्थ्यांनी ड्रायफ्रुट्स आणि फ्रुट्सपासून डीश सजावट, टाकाऊपासून टिकाऊ वस्तू सजावट, बिनभांड्यांचा स्वयंपाक इ. स्पर्धांमध्ये आनंदाने सहभाग घेतला.

श्री. सावंत या प्रशिक्षकांनी गाठीचे प्रशिक्षण व BP ६ व्यायामप्रकार या संदर्भात मार्गदर्शन केले.



१२ एप्रिल रोजी रात्री शेकोटीच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यात प्रमुख पाहुणे म्हणून स्काऊट-गाईड जिल्हा कमिशनर सौ. करंदीकर व स्काऊट-गाईड जिल्हा अध्यक्ष मा. श्री. केदार जोशी यांना आमंत्रित केले होते. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

ज्याला स्वतःच्या आवडीचे काम करण्याची संधी मिळते तो खरोखरच भाग्यवान. - कार्लाइल

विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष मा. श्री. डॉ. विजय बेडेकर यांच्या शुभहस्ते तंबू सजावट कार्यक्रमाचे उद्घाटन व परीक्षण करण्यात आले.

दि. १३ एप्रिल १७ रोजी सायंकाळी ४.०० वाजता या शिबिराची सांगता झाली.

सदर शिबिरात सौ. देवघरे, सौ. चव्हाण, श्री. तळेले, श्री. सोनवणे, श्री. पांचाळ, श्री. शिंदे इत्यादी शिक्षक सहभागी झाले होते.

## जोशी-बेडेकर महाविद्यालय

### महाविद्यालयाच्या प्रांगणांत ६८ वा 'महाराष्ट्र दिन' साजरा

दिनांक १ मे २०१७ रोजी महाविद्यालयाच्या प्रांगणात ६८ वा 'महाराष्ट्र दिन' साजरा करण्यात आला. आपणा सर्वांस ठाऊकच आहे की, १ मे १९६० रोजी आपले महाराष्ट्र राज्य निर्माण झाले. तेव्हापासून महाराष्ट्रात १ मे हा दिवस दरवर्षी 'महाराष्ट्र दिन' म्हणून साजरा केला जातो.

ह्यावर्षी १ मे २०१७ रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतन, विधी, कला व वाणिज्य, व्यवस्थापन व विज्ञान महाविद्यालयांच्या प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी तसेच छात्रसेनेच्या विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत 'महाराष्ट्र दिन' साजरा करण्यात आला. ह्या प्रसंगी विप्रमंच्या विज्ञान महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावर ह्या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. डॉ. सौ. पेजावर यांनी याप्रसंगी ध्वजारोहण करून उपस्थितांना मार्गदर्शन केले. ह्यावेळी छात्रसेनेच्या विद्यार्थ्यांनी प्रमुख अतिथींना सलामी दिली.

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

### महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची डेन्मार्क येथे 'आंतरराष्ट्रीय तरुण वैज्ञानिक' म्हणून निवड

तृतीय वर्षात शिकत असलेल्या कु. यश देशपांडे (सूक्ष्मजीवशास्त्र) आणि कु.काजल नौकारीया (जैवतंत्रज्ञान) या विद्यार्थ्यांची डेन्मार्क येथे 'आंतरराष्ट्रीय तरुण वैज्ञानिक' स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे विजेते म्हणून निवड करण्यात आली आहे. त्यांनी या स्पर्धेत सुवर्णपदक मिळवले आहे.

डेन्मार्क येथे दरवर्षी एप्रिल महिन्यात 'डॅनिश यंग सायंटिस्ट फेअर अँड कॉन्टेस्ट' ही स्पर्धा आयोजित केली जाते. या वर्षी स्पर्धेत कु.यश आणि कु.काजल यांनी भारतातून वि.प्र.मं. चे बा.ना.बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व केले. त्यांनी 'द हिडन ट्रेझर ऑफ वर्मीवाश अँड अग्रीकल्चरल बून' या विषयावर आपला पेपर सादर केला. कु सुभाष खत्री व कु प्रणिती घाटमाळे या विद्यार्थ्यांचाही या संशोधनात सहभाग होता.

वि.प्र.मं.चे बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या जैवतंत्रज्ञान व सूक्ष्मजीवशास्त्र विभागात विविध प्रकल्प विद्यार्थ्यांसाठी राबविले जातात. मिनी रिसर्च प्रोजेक्ट उपक्रम त्यापैकी एक. याद्वारे हे विद्यार्थी सुमारे अडीच वर्षे या प्रकल्पावर संशोधन करीत होते. डॉ. कल्पिता मुळये, डॉ जयश्री पवार व प्रा. झहेरा मोमीन यांनी त्यांना मार्गदर्शन केले. प्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावर या मुलांबरोबर डेन्मार्क येथे मार्गदर्शक म्हणून गेल्या होत्या.

'डॅनिश यंग सायंटिस्ट फेअर अँड कॉन्टेस्ट' मध्ये डेन्मार्कमधील सुमारे १०० स्टॉल्स आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताबरोबरच चीन, नॉर्वे, आयलँड या देशाच्या स्टॉल्सचा सहभाग होता. डेन्मार्कमधील सुमारे ७५०० ते ८००० लोकांनी या स्टॉल्सना भेट देऊन प्रकल्पाची माहिती मिळविली.



डॉ. सुधाकर आगरकर, डीन, व्ही. पी. एम. अकॅडेमी ऑफ इंटरनॅशनल एज्युकेशन अँड रिसर्च यांच्या मार्गदर्शनाखाली गत वर्षीपासून महाविद्यालय विद्यार्थ्यांना या स्पर्धेसाठी पाठवीत आहे. विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांचा पाठिंबा व प्रोत्साहना मुळेच महाविद्यालय नेहमीच विविध आघाड्या सर करीत आहे. यशस्वी घौडदौडीचे हे सलग दुसरे वर्ष आहे. मुलांच्या शैक्षणिक विकासाबरोबरच संशोधन कौशल्य व व्यक्तिमत्व विकासाकरता महाविद्यालयातर्फे राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचे हे फलित आहे. समस्त ठाणेकरांकरिता ही अभिमानाची बाब आहे. महाविद्यालयाच्या सर्व विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर सहकाऱ्यांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

**महाविद्यालयातील विद्यार्थ्याची Ph.D अभ्यासक्रमाकरता निवड**



तृतीय वर्ष सूक्ष्मजीव विभागात शिकत असलेल्या कु. सुभाष खत्री याची टाटा इंन्स्टिटच्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च या संस्थे मध्ये Ph. D या इंटिग्रेटेड अभ्यासक्रमाकरिता निवड झाली आहे.

TIFR संस्था ही भारतातील एक उत्तम समजली जाणारी संशोधन संस्था आहे व तिची ख्याती ही आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचली आहे.

येथे निवड होण्याकरिता जवळपास ४००० जणांनी लेखी परीक्षा दिली होती. त्यापैकी केवळ १५२ जण मुलाखतीस निवडण्यात आले, त्याच्यातून ३५ जण पुन:मुलाखतीकरता निवडले गेले. व या ३५ जणांमधून शेवटी केवळ ६ विद्यार्थी Ph. D या अभ्यासक्रमाला निवडले गेले. त्यापैकी सुभाष खत्री हा एक विद्यार्थी आहे.

विद्यार्थ्यांना विविध पातळीवर बांदोडकर महाविद्यालयातर्फे संधी उपलब्ध करून दिल्या जातात जैवतंत्रज्ञान आणि सूक्ष्मजीव विभागातर्फे नियमित विविध स्पर्धा परीक्षा, मार्गदर्शन शिबिरं, व्याख्याने आयोजित केली जातात.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती**

दि. १४ एप्रिल २०१७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२६ व्या जयंती निमित्त महाविद्यालयाच्या ग्रंथालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या माहितीचे प्रदर्शन भरवण्यात आले होते.

तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर यांनी पुष्पहार अर्पण केला. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या की, राज्यघटनेत स्त्रियांना सर्वत्र अधिकार मिळाले पाहिजेत अशी तरतूद त्यांनी केली. त्यामुळे दुर्बल समजल्या जात असलेल्या स्त्रिया सबल होण्यास मदत झाली.

ग्रंथालय व कार्यालयीन कर्मचारी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून त्यांचे आशीर्वाद घेतले.

## महात्मा जोतिबा फुले जयंती



दि. ११ एप्रिल २०१७ रोजी महात्मा जोतिबा फुले यांच्या १९० व्या जयंती निमित्त महाविद्यालयाच्या ग्रंथालयात जोतिबा फुले यांच्या माहितीचे प्रदर्शन भरवण्यात आले होते.

तसेच महात्मा फुले यांच्या प्रतिमेस प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर यांनी पुष्पहार अर्पण केला. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या की, स्त्री शिक्षण सुरू होण्यासाठी त्यावेळी फुले यांनी खाल्लेल्या खस्तांमुळे आज २१ व्या शतकात अनेक स्त्रिया या उत्तुंग भरारी घेत आहेत. त्यांच्या या कार्याबाबत समस्त स्त्री वर्ग ऋणी राहिलं.

महाविद्यालयाच्या ग्रंथपाल सौ कादंबरी मांजरेकर यांनी यावेळी स्त्री शिक्षणाव्यतिरिक्त जोतिबा फुले यांच्या कार्याबद्दल थोडक्यात माहिती सांगितली.

ग्रंथालय व कार्यालयीन कर्मचारी तसेच शिक्षक व शिक्षकेतर सहकारी आणि विद्यार्थी यांनी महात्मा जोतिबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून त्यांचे आशीर्वाद घेतले.

## प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर आनंद चॅरिटेबल ट्रस्टच्या 'नवदुर्गा' पुरस्काराने सन्मानित.

चैत्र नवरात्र उत्सवनिमित्त ठाण्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्मयोगी मान्यवरांचा 'नवदुर्गा व नवरत्न पुरस्कार' देऊन गौरव करण्यात आला.

ठाण्याच्या महापौर मीनाक्षी शिंदे व खासदार श्री. राजन विचारे यांच्या आनंद चॅरिटेबल ट्रस्ट तर्फे उद्यम, शिक्षण, समाजकल्याण, लेखन, पत्रकारिता, प्रकाशन, वैद्यकीय, आदी विविध क्षेत्रांत विशेष व उल्लेखनीय ओळख निर्माण करणाऱ्या ठाणेकरांना हा पुरस्कार देऊन सन्मान केला जातो. यावर्षीच्या शिक्षण क्षेत्रातील विशेष उल्लेखनीय कारकीर्दीसाठी विद्या प्रसारक मंडळाच्या बा.ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर यांची निवड झाली.

ठाणे महानगरपालिकेच्या ठाणे गौरव, इंडियन मर्चंट ऑफ कॉमर्स आय.एम.सी बजाज पुरस्कार आणि आता नवदुर्गा पुरस्कार असा त्रिवेणी बहुमान प्राचार्यांना मिळाला.

शिक्षणक्षेत्रात विद्यार्थी घडवीत असताना स्वतःच्या कारकीर्दीचाही आलेख उंचावत राहणे व विद्यार्थी, शिक्षक, संस्था व समाज यामध्ये स्वतःची 'ज्ञानतपस्वीनी' अशी वेगळी प्रतिभा व प्रतिमा प्रस्थापित करून सर्वांच्या मनात अढळ स्थान निर्माण करणाऱ्या प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर यांना हा पुरस्कार जाहीर झाल्यावर ठाण्यातील छत्रपती शिवाजी महाराज मैदानात चैत्र नवरात्र उत्सवात व एका देखण्या आयोजनात या पुरस्काराचे वितरण सौ. रश्मी उद्धव ठाकरे, महापौर मीनाक्षी शिंदे, आयोजक खासदार राजन विचारे, नगरसेविका सौ. नंदिनी विचारे, सामना वृत्तपत्राचे संपादक खासदार संजय राऊत, परिवहन मंत्री दिवाकर रावते, ठाणे महानगरपालिका आयुक्त मा. संजीव जयस्वाल, खासदार श्रीकांत शिंदे इत्यादी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.



पुरस्काराचा स्वीकार करताना डॉ. माधुरी पेजावर म्हणाल्या की, 'हा माझ्या एकटीचा सन्मान नसून माझ्या महाविद्यालयातील २७० सहकाऱ्यांचा एकत्रित प्रयत्नांचा हा सन्मान आहे. तसेच खासदार श्रीकांत शिंदे, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू मा.श्री. डॉ. संजय देशमुख, राजन




विचारे, चिटणीस सर, प्रा. संतोष राणे हे सर्व विद्या प्रसारक मंडळाचे विद्यार्थी आहेत म्हणजे हा एक प्रकारे ह्या या संस्थेचा सन्मान आहे.' असे विनम्र मनोगत त्यांनी व्यक्त केले.

विद्यार्थी, सहकारी शिक्षक, शिक्षकेतर सहकारी व विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्याकडून प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

**भगतसिंग, सुखदेव व राजगुरू यांच्या जाज्वल्य राष्ट्रभक्ती, त्याग आणि विचारांना बांदोडकरचा शहीद-दिनाला त्रिवार सलाम**



२३ मार्च १९३१ रोजी शहीद भगतसिंग, सुखदेव व राजगुरू यांना फाशी देण्यात आली. या वीरांच्या जाज्वल्य राष्ट्रभक्ती, त्याग आणि क्रांतिकारक विचारांना सलामी म्हणून व आजच्या तरुण पिढीला हे विचार प्रेरणादायी ठरावेत म्हणून या 'शहीद दिनी' विद्या प्रसारक मंडळाच्या बा.ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात प्राचार्या, उपप्राचार्य, कार्यालयीन सहकारी, ग्रंथालय विभाग व एन.एस.एस. आणि राष्ट्रीय छात्र सेना यांच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

फाशीला जाण्यापूर्वी भगतसिंग म्हणाले होते, 'माझे आयुष्य चारच दिवसाचे असेल, पण माझ्या आकांक्षेची मशाल माझ्या ह्दयात पेटत राहील आणि उद्या जरी मी नसलो तरीही माझ्या आकांक्षा या देशाच्या होऊन शोषणकर्त्यांचा शेवटपर्यंत मुकाबला करत राहील. माझा माझ्या देशाच्या भवितव्यावर विश्वास आहे.'



या आदरांजलीसाठी उपप्राचार्य डॉ. अशोक पाटील व महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर सहकारी, कार्यालयीन व ग्रंथालयीन सहकारी, विद्यार्थी, एन.सी.सी. छात्र, इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

**'जागतिक जलसंवर्धन दिन' निमित्त जलजागृती**

जागतिक जलसंवर्धन दिनानिमित्ताने विद्या प्रसारक मंडळाच्या बा.ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात जलजागृती करण्यात आली. यामध्ये मानवी साखळी रॅली व एका प्रबोधनात्मक व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या

एन.सी.सी. युनिट ने पुढाकार घेऊन सांस्कृतिक विभाग, एन.एस.एस. विभाग, जागर जाणिवांचा अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या या जनजागृतीसाठी १ एम.ए.एच.बि.एन. आर्मी एन.सी.सी. बटालियन कंपनी कमांडर श्री राजपूत व पी. आय. स्टाफ श्री. अजय कुमार आवर्जून उपस्थित होते.

महाविद्यालयाच्या लगत असणारी ठाणे खाडी व ठाणे हे तलावांचे शहर असल्यामुळे तलावांचे सुशोभीकरण व त्यांचे संवर्धन तसेच पिण्याच्या पाण्याचे संवर्धन, भूगर्भातील पाण्याची पातळी, याविषयी एन.सी.सी. च्या विद्यार्थ्यांनी नागरिकांमध्ये जाऊन जनजागरण केले यासाठी आसपासच्या परिसरातील वसाहती व सोसायट्यांमध्ये जलजागृती करण्यात आली.

प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर हरियाली, होप व जिज्ञासा या अशासकीय संस्थांशी निगडित आहेत. त्यांचे 'जलसंवर्धन व जलजागृती' या विषयावरील व्याख्यानाचे दुपारी आयोजन करण्यात आले. यामध्ये तलावांमध्ये असणारे सूक्ष्म जीव, पाणवनस्पती, त्यातील घटक, अन्नसाखळी, पाणवनस्पती पूर्णपणे काढणे चुकीचे, नागरिकांचे कचरा टाकणे, निर्माल्य टाकणे या सवयींमुळे तलावांची होणारी हानी, अतिक्रमणे, यामुळे तलावांची संख्या कमी झाली, हरियालीच्या माध्यमातून गणेश तलावाला एका नैसर्गिक तलाव व धबधब्याचे रूप देऊन तिथे बिबटे, माकडे, व पक्षी यांचे होणारे दर्शन, त्यामुळे होणारे Reforestation तसेच 'पाणी अडवा पाणी जिरवा' या युक्तीप्रमाणे व डॉ. राजेंद्र सिंग यांच्या नदीजोड प्रकल्पाप्रमाणे अण्णा हजारे यांना भेटून हरियालीच्या मदतीने जलसंवर्धन करण्यात आले. याची थोडक्यात यशोगाथाही प्राचार्यांनी येथे सांगितली व पावसाच्या पाण्याचे Harvesting बोअरवेल साठी भूगर्भातील पाणी वाढविणे. कारण ८० टक्के पाणी हे जमिनीखाली मिळते व ६५ टक्के विहिरींमधून मिळते. तसेच पाण्याचा पुनर्वापर ही संकल्पना प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर यांनी काळाची गरज म्हणून उल्लेखली. आपण पाणी निर्माण करू शकत नाही म्हणून ते वाचवायला हवे, असे सांगून व्याख्यानाची सांगता करताना त्यांनी जलप्रतिज्ञा सर्वांकडून म्हणून घेतली.



या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.प्रकाश माळी यांनी केले. तसेच रॅली व मानवी साखळी यामध्ये प्रा. रोहिणी डोंबे, लेफ्टनंट प्रा. बिपीन धुमाळे तसेच जागर जाणिवांच्या अभियानाचे प्रा. अनिल आठवले इत्यादी प्राध्यापक व विद्यार्थी सहभागी झाले होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

### तंत्रनिकेतनातील भव्य प्रकल्प प्रदर्शनाचे आयोजन

दिनांक ३ व ४ मार्च २०१७ रोजी व्ही. पी. एम. तंत्रनिकेतन व विज्ञान भारती (विभा) यांच्या संयुक्त विद्यमाने विज्ञान दिनाचे औचित्य साधून तंत्रनिकेतनातील विद्यार्थ्यांसाठी प्रकल्प स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेसाठी पदविकेच्या तृतीय वर्षाला असणाऱ्या विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने प्रतिसाद दिला. तंत्रनिकेतनातील मेडिकल इलेक्ट्रॉनिक्स, केमिकल इंजिनिअरींग, इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स, इलेक्ट्रीकल पावर सिस्टिम, कॉम्प्युटर इंजिनिअरींग, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी व इन्स्टुमेंटेशन या सात शाखांमधील विद्यार्थी स्पर्धेत सहभागी झाले.

दिनांक ३ मार्च रोजी दुपारी १२ वाजता सर्व परीक्षकांचे व विभा आयोजकांचे तंत्रनिकेतनात आगमन झाले. संस्थेतर्फे सर्वांचे स्वागत झाल्यानंतर सर्व परीक्षक त्यांना नेमून दिलेल्या डिपार्टमेंटमध्ये परीक्षणासाठी गेले. या दोन्ही दिवसांसाठी तंत्रनिकेतनातर्फे श्री. तुषार मोहिते-पाटील व सौ. कीर्ती आगाशे तसेच 'विभा' तर्फे श्री. विनय नाईक यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले.

सर्व विद्यार्थ्यांनी अतिशय उत्तमपणे त्यांचे प्रकल्प परीक्षकांसमोर मांडले. एअर कोर जनरेटर (Air Core Generator), स्वयंपाकातील टाकाऊ तेलापासून बायोडिझेलची निर्मिती, वेब फ्लडिंग (Web flooding) अशा विविध विषयांवर विद्यार्थ्यांनी प्रकल्प सादर केले. या सादरीकरणात विद्यार्थ्यांनी विविध तक्ते, मॉडेल्स, प्रेझेंटेशन्सचा वापर केला. यावेळी विद्यार्थ्यांचे संभाषण कौशल्य, तांत्रिक ज्ञान, विषय मांडण्याची शैली असे अनेक गुण तपासले गेले. दुपारी १ ते ५ या वेळेत परीक्षणाचे कार्य पार पडले.

दुसऱ्या दिवशी या प्रकल्पांचे प्रदर्शन व्ही. पी. एम. तंत्रनिकेतनात भरविण्यात आले. ठाणे परीसरातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांना या प्रदर्शनासाठी आमंत्रित केले होते. ठरवून दिलेल्या वेळेनुसार अनेक शाळा आपल्या विद्यार्थ्यांना घेऊन हजर झाल्या. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना प्रथम तंत्रनिकेतनाची ओळख एका ध्वनिचित्रफितीद्वारे करून देण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी विविध डिपार्टमेंटमध्ये जाऊन तेथे मांडलेले प्रकल्प पाहिले. या प्रकल्प प्रदर्शनाच्या निमित्ताने शालेय विद्यार्थ्यांना इलेक्ट्रीकल, इलेक्ट्रोनिक्स, केमिकल, मेडिकल इलेक्ट्रोनिक्स, कॉम्प्युटर अशा विविध विषयांवरील प्रकल्प एकाच ठिकाणी पाहावयास मिळाले.

सायंकाळी ४.०० वाजता पारितोषिक वितरण समारंभ झाला. यावेळी तंत्रनिकेतनाचे प्राचार्य श्री. नायक, प्रमुख पाहुणे श्री. बापट (CMD लॅब इंडिया) व विभा संस्थेचे अनेक मान्यवर उपस्थित होते. 'मेक इन इंडिया' प्रत्यक्षात आणण्यासाठी विद्यार्थ्यांचे तंत्रकौशल्य विकसित करणे आवश्यक आहे व अशा प्रकल्प स्पर्धा सर्व विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त आहे, असे मत व्यक्त करत श्री. बापट यांनी सर्व आयोजकांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांचे तांत्रिक कौशल्य, त्यांनी केलेली मेहनत, त्यांना मिळालेले शिक्षकांचे मार्गदर्शन वाखाणण्याजोगे होते, अशी प्रतिक्रिया विभाच्या सर्व परीक्षकांनी व्यक्त केली. प्रत्येक शाखेतील दोन प्रकल्पांना यावेळी पारितोषिक देण्यात आले. तंत्रनिकेतनाचे प्राचार्य प्राध्यापक श्री. नायक यांनी विभाच्या सर्व सदस्यांबाबत कृतज्ञता व्यक्त करून कार्यक्रमाची सांगता केली.

हे प्रकल्प प्रदर्शन सर्व विद्यार्थ्यांच्या दृष्टीने फारच उपयुक्त ठरले.

**विद्या प्रसारक मंडळाचे, तंत्रनिकेतनला राष्ट्रीय मूल्यांकन बोर्ड नवी दिल्ली तर्फे मूल्यांकीत दर्जा प्राप्त**

विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे या अग्रगण्य तांत्रिक शिक्षण देणाऱ्या संस्थेला नवी दिल्ली येथील राष्ट्रीय मूल्यांकन बोर्ड (NBA) तर्फे 'मूल्यांकीत' दर्जा प्राप्त झाला. खालील पाच अभ्यासक्रमाकरिता NBA 'मूल्यांकीत' दर्जा मिळाला आहे. ते अभ्यासक्रम खालीलप्रमाणे -

- कंम्प्युटर इंजिनिअरिंग
- इर्न्फेमेशन टेक्नॉलॉजी
- इलेक्ट्रीकल पावर सिस्टीम
- इंन्स्ट्रुमेंटेशन इंजिनिअरिंग
- इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स

वरील पाच अभ्यासक्रमांसाठी NBA द्वारा तज्ज्ञ समितीने दि. २४ ते २६ मार्च २०१७ रोजी सखोल पाहणी करून मूल्यांकन केले. त्यामध्ये संस्थेतर्फे उपलब्ध

मुलभूत सोयी-सुविधा, अध्ययन अध्यापन प्रक्रिया, ग्रंथालय सुविधा, प्रयोगशाळा आणि इतर कार्यक्रम (Activity) इत्यादींचा समावेश होता.

संबंधित तज्ज्ञ समितीच्या पाहणी आणि मुल्यमापन अहवालाच्या आधारे 'राष्ट्रीय मूल्यांकन बोर्ड' (NBA) नवी दिल्ली याजकडून विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतनला 'मूल्यांकीत' दर्जा नुकताच प्राप्त झाला.

ठाण्यातील विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन हे NBA - मूल्यांकीत दर्जा प्राप्त केलेले प्रथमच तंत्रनिकेतन होय हे विशेष...

**व्ही.पी. एम्स् तंत्रनिकेतनच्या Electrical Power System विभागाच्या Electrical Measurement Laboratory ला MSBTE चा २०१५-१६ चा 'सर्वोत्तम प्रयोगशाळा पुरस्कार' प्राप्त.**




विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे या संस्थेच्या इलेक्ट्रीकल पॉवर सिस्टिम विभागातील Electrical Measurement Laboratory ला महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचा २०१५-१६ सालासाठीचा 'सर्वोत्तम प्रयोगशाळा पुरस्कार' मिळाला. सदरचा पुरस्कार दि. ३० मार्च २०१७ रोजी MSBTE च्या मुख्यालयात डॉ. अभय वाघ, डायरेक्टर MSBTE यांचे शुभहस्ते तंत्रनिकेतनचे प्राचार्य दि. कृ. नायक EPS विभागप्रमुख प्रा. सौ. निशा वडेर व सहकारी यांनी स्वीकारला.

कोणत्याही तांत्रिक वा वैज्ञानिक शिक्षणाचा 'प्रयोगशाळा' हा मुख्य घटक असतो. प्रयोगशाळेद्वारे विद्यार्थ्यांना विषयाचे चांगल्याप्रकारे आकलन होत असते. तंत्रनिकेतनच्या Electrical Measurement Laboratory द्वारे विद्यार्थ्यांना इलेक्ट्रीकलमधील तंत्रज्ञानाचे प्रयोगाद्वारे सरावाने चांगले आकलन होण्यास मदत होते. विविध प्रकारची मोजमापन तंत्राचे ज्ञान हे इलेक्ट्रीकल मोजमापन प्रयोगशाळेत विद्यार्थ्यांना होत असतात. ह्या मोजमापनाद्वारेच इलेक्ट्रीकल अभियांत्रिकी सिद्धांत अवलंबून असतात.

इलेक्ट्रीकल मोजमापन लॅबद्वारे विविध प्रकारची सर्किट पॅरालिटरद्वारे केली जातात. उदा. व्होल्टेज (दाब) करँट (प्रवाह) फ्रिक्वेन्सी, विविध प्रकारच्या शक्ती, ऊर्जा इत्यादींचा त्यात समावेश असतो. आराखडीत प्रयोगशाळा आणि केंद्रीभूत नियंत्रण पॅनल सिस्टिमद्वारे तिची सुरक्षितता वाढविली आहे.

'मिटर टेस्ट बेंच' उभारणी ही तंत्रनिकेतन विद्यार्थ्यांकडून प्रकल्पाद्वारे विकसित केली. त्यामुळे विविध प्रकारच्या मिटरचे अचूक मोजमाप घेण्यास उपयुक्त ठरत आहे.

थ्री फेज इलेक्ट्रीकल एनर्जी मीटर आणि त्यांची विविध कार्य, स्कल्ड-डाऊन मॉडेलचे थ्री फेज ट्रान्सफॉर्मर, लेटेस्ट ऊर्जा बचत तंत्रे, फ्लक्स मिटर, मेजर, अर्थ टेस्टर, विविध कट-शेक्सन मिटरचे मॉडेल शिवाय योग्य व सोयी-सुविधांनी युक्त प्रयोगशाळेची उभारणी, साधनसामुग्री निवारक यंत्रे नवनिर्मितीस वाव व सुसंधी इत्यादी वैशिष्ट्ये ह्या प्रयोगशाळेची आहेत.

## सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

**२०१६-२०१७ च्या बालवीर राष्ट्रपती पुरस्काराचा निकाल :**

राष्ट्रपती पुरस्कार मिळालेल्या बालवीरांची नावे खालीलप्रमाणे :

१) कु. हार्दिक सावंत  २) कु. संस्कार चव्हाण  ३) कु. हिर गाला  ४) वत्सल गाला

**इंग्रजी विषयाकरिता Innovative Council यांने आयोजित केलेल्या All India Open Competitive Scholarship Exam चा निकाल :**

| क्र. | इयत्ता | विद्यार्थ्याचे नाव | % | क्रमांक | पदक |
|---|---|---|---|---|---|
| १ | ५ वी | निहारीका मोरे | ८७.५ | २रा | रजत |
| २ | | अर्णव वैद्य | ८५ | ३रा | कांस्य |
| ३ | ८ वी | चैताली माजरेकर | ८१.६७ | १ला | सुवर्ण |
| ४ | | रिद्धी वझे | ७८.३३ | २रा | रजत |
| ५ | | अनघ करमरकर | ७५ | ३रा | कांस्य |
| ६ | ९ वी | सरगुंदिपकौर सचदेव | ७८.३३ | १ला | सुवर्ण |
| ७ | | अदिती देवधर | ७६.६७ | २रा | रजत |
| ८ | | निशिता फडके | ७१.६७ | ३रा | कांस्य |

**फेबु. २०१७ – टिळक विद्यापीठ गणित परीक्षेचा निकाल : १००%**

| इयत्ता | परीक्षेला बसलेले विद्यार्थी | प्राविण्य प्राप्त विद्यार्थी | प्रथम श्रेणीत उत्तीर्ण | द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण | तृतीय श्रेणीत उत्तीर्ण |
|---|---|---|---|---|---|
| ५ वी | ६ | २ | २ | २ | – |
| ६ वी | १० | १ | ७ | १ | १ |
| ७ वी | ४ | २ | २ | – | – |
| ८ वी | ५ | १ | ३ | – | १ |

**सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे :**

| इयत्ता | नाव | गुण |
|---|---|---|
| ५ वी | रुद्र पाटील | ९४ |
| ६ वी | कुष दसताने | ८८ |
| ७ वी | सिद्धार्थ वेर्णेकर | ९३ |
| ८ वी | हित जैन | ९० |

**Geo Genius आयोजित Geography Olympiad चा निकाल :**

कु. शुभम शेळके व कु. विश्वराज बोरकर यांनी सुवर्ण पदके पटकावली व राज्य स्तरीय स्पर्धेकरिता त्यांची निवड झाली.

लाकूड घेऊन अरण्यात जाणे मूर्खपणाचे आहे. – होरेस

केले. संकृत साहित्याचा अभ्यास करण्यासाठी केवळ भाषेचे ज्ञान असणे पुरेसे नाही. त्या अभ्यासकांमध्ये संशोधक वृत्ती असणे आवश्यक आहे. बऱ्याचदा असे होते की भाषा येते पण संशोधक वृत्ती नाही. याउलट संशोधक वृत्ती आहे पण भाषेचे ज्ञान नाही असेही आढळते. अशा संशोधकांच्या हातून उपयुक्त काम होणार नाही. या दोन्ही वृत्ती ज्यांच्यामध्ये आहेत अशी माणसे हेरून त्यांना संस्कृत साहित्याच्या अभ्यासाला सरकारने प्रेरित करावे असे मत मॅक्डोनेलने लेखात व्यक्त केले हाते.

वर सांगितल्याप्रमाणे ब्रिटिश राजवटीचा भारतातील पाया मजबूत करण्यासाठी संकृत भाषेच्या अभ्यासाचे महत्त्व विशद करणे हा मॅक्डोनेल यांच्या लेखाचा मुख्य उद्देश होता. तो त्यांनी प्रभावीपणे साध्य केलाच. त्याचबरोबर ब्रिटिश आमदानीत या भाषेच्या शिक्षणाची क्‌काय परिस्थिती होती याचादेखील ते आपल्या लेखात उहापोह करतात. त्यांच्या मते भारतात ज्ञानसाधनेसाठी संस्कृतच्या अभ्यासाची नितांत गरज आहे. विशेषतः भारताचा समृद्ध इतिहास समजून घेण्यासाठी या भाषेच्या अभ्यासाखेरीज दुसरा मार्ग नाही. या दृष्टीने विचार करता संस्कृत भाषेचा सखोल अभ्यास होणे आवश्यक आहे. म्हणून शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावर संस्कृत ही एक अनिवार्य भाषा म्हणून शिकविली जावी. प्रत्यक्षात मात्र या भाषेच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष केले जाते. जिथे ही भाषा शिकविली जाते तिथे सगळा भर हा श्लोक पाठ करून घेण्यावर असतो. विश्लेषणात्मक दृष्टीने या भाषेचे शिक्षण होत नाही अशी खंत त्यानी व्यक्त केली आहे. संस्कृत भाषेच्या शिक्षणाची जी हेडसांड भारतात होत आहे त्यामुळे शिक्षित भारतीय आपल्या परंपरेपासून दूर जात आहे. ही बाब इंग्रज राजवटीला पूरक असली तरी भारतीय समाजाच्या विकासाला मारक आहे असे मत त्यानी व्यक्त केले होते.

मॅक्डोनेल यांच्या लेखाला शतकाहून जास्त काळ लोटला आहे. भारतात संस्कृत भाषेच्या अध्यापनाकडे होणारे दुर्लक्ष ही चिंतेची बाब आहे हे त्यानी शंभर वर्षापूर्वीच ओळखले होते. त्यानी व्यक्त केलेली खंत किती योग्य होती याचा अनुभव आपण पदोपदी घेत आहोत. केवळ इंग्रज राजवटीतच नव्हे तर भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरदेखील आम्ही संस्कृत भाषेच्या शिक्षणाकडे दुर्लक्षच केले. एव्हढेच नव्हे तर प्रादेशिक भाषेचे शिक्षणाचे माध्यम झुगारून आम्ही इंग्रजी माध्यमाचा स्वीकार केला. त्यामुळे आपल्या संस्कृतीशी नाड तुटलेला आणि आपल्या मातृभाषेतून प्रभावीपणे विचार मांडण्यात सक्षम नसलेला समाज आम्ही निर्माण केला. असा समाज संगणकाचा वापर करून माहितीचे संकलन करू शकेल पण नवनिर्मिती करू शकणार नाही. असेच जर चालू राहिले तर आपण जगाला सेवाच पुरवत राहू, नवीन ज्ञान देऊ शकणार नाही. ही धोक्याची घंटा आहे. त्याची आपण वेळीच दखल घेतली नाही तर भविष्यात पश्चातापाची वेळ आपल्यावर आल्याशिवाय राहणार नाही.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

•••

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- ❉ अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- ❉ वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- ❉ वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.